अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. १ जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २७२ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

चार हजारांची लाचेची मागणी ; वरिष्ठ लिपिकावर गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

दाखल दाव्यातील रोजनाम्याचे नकला देण्याकरिता चार हजाराची लाचेची मागणी केल्याप्रकरणी उप निबंधक सहकारी संस्था कार्यालयातील वरिष्ठ लिपिक हेमंत माडीवाळप्पा नाईकवाडी (वय ४४) याच्यावर चार हजाराच्या लाचेची मागणी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. तक्रारदारावर सावकारी दावा दाखल करण्यात आला आहे. या दाव्यास

स्थगिती मिळण्यासाठी तक्रारदाराला उच्च न्यायालयात अर्ज करायचे होते. यासाठी त्याने दाखल दाव्यातील रोजनाम्याचे नकला मिळणेबाबत २९ मार्च २०२३ मध्ये अर्ज केला होता. यासाठी आरोपी नाईकवाडी याने चार हजारांची लाचेची मागणी केली. याप्रकरणी १३ एप्रिल रोजी पडताळणी करण्यात आली.

याप्रकरणी आरोपी हेमंत नाईकवाडे याच्यावर लाचेची मागणी केल्याप्रकरणी सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार, पोलीस निरीक्षक चंद्रकांत कोळी, उमाकांत महाडिक, शिरीषकुमार सोनवणे, श्रीराम घुगे, नरोटे, सुरवसे यांनी केली.

अक्कलकोटजवळ भीषण अपघात, आळंदचे सहा भाविक जागीच ठार

शिरवळवाडीत ट्रक आणि क्रूझरची टक्कर, दर्शन करून गावी जात असताना काळाची झडप

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील शिरवळवाडीजवळ क्रूझर जीप व ट्रक या दोन वाहनांमध्ये भीषण अपघात होऊन सहा भाविक ठार झाले तर अकराजण जखमी झाले. ही दुर्दैवी घटना शुक्रवारी साडे चार वाजण्याच्या सुमारास घडली. मृत पावलेले इसम आळंद तालुक्यातील अन्नूर गावचे आहेत. स्वामी समर्थांचे दर्शन घेऊन आपल्या गावी जात असताना काळाने त्यांच्यावर झडप घातली. अपघाताची माहिती समजताच शिरवळवाडीचे ग्रामस्थ व अक्कलकोटचे पोलीस तातडीने घटनास्थळी येऊन मदतकार्य हाती घेतले. अपघातानंतर ट्रक चालक पसार झाला.

अन्नूर गावचे सतराजण क्रूझरमधून (केए ३५ ए ७४९५) अक्कलकोटला आले होते. स्वामी समर्थांचे दर्शन घेऊन ते आपल्या गावी निघाले होते. दरम्यान शिरवळवाडीजवळ गुलबर्ग्याहून सोलापूरकडे सिमेंटचा ट्रक (एम एच १२ यु एम ७१८६) येत होता. दोनही वाहनांची जोरदार टक्कर झाली. क्रूझरचा चेंदामेंदा झाला. ट्रकच्या धडकेने जीप दूरवर फेकली गेली. त्यात सहाजण जागीच ठार झाले तर ११ जण जखमी झाले. जखमींमध्ये ५ महिला व एका मुलाचा समावेश आहे. संगीता मदन माने (वय ३५ रा. बेडगे ता . उमरगा) , सुंदराबाई भारतसिंग राजपूत (वय ५५ रा अन्नुर ता.आळंद) ललिता महादेव बग्गे (वय ५० रा अन्नुर), साईनाथ गोविंद पुजारी (वय १० रा अन्नुर), रोहिणी गोपाळ पुजारी (वय ४० रा अन्नुर ता.आळंद), छाया हणमंत ननवरे (वय ४६ रा इंदापूर जि.पुणे) अशी मयतांची नावे आहेत. या अपघातामध्ये सुमीत गोपाळ पुजारी (वय ९ वर्षे), रेखा गोविंद पुजारी (वय ४० वर्षे),गोपाळ चंद्रकांत पुजारी (वय ४५ वर्षे), अजित अशोक कुंदले (वय ३० वर्षे), भाग्येश अशोक कुंदले (वय १९ वर्षे), कल्पना अशोक कुंदले (वय ४० वर्षे), महानंदा लक्ष्मण कुंदले (वय ३२),अशोक सिद्राम कुंदले (वय ४५ वर्षे),कोमल माणिक शामेदे (वय ५०),सुनील हणमंतु पांचाळ (वय ५०) सर्व रा.अन्नुर ता.आळंद व विठ्ठल हणमंत ननवरे (वय ३५ वर्षे)इंदापूर असे ११ जण जखमी झाले आहेत.

अपघात झाल्याची माहिती कळताच रिपाईचे तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दिलीप सिद्धे, वागदरीचे उमेश पोमाजी यांच्यासह शिरवळवाडीचे ग्रामस्थ तातडीने घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान पोलीसही आले. साऱ्यांनी मिळून मदतकार्य सुरू ठेवले. जखमींना सोलापूरच्या रुग्णालयात हलवण्यासाठी पोलीस व ग्रामस्थांनी मोलाची मदत केली. त्याअगोदर अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात डॉ. अंजुम सय्यद, डॉ. शुभम घंट डॉ मंजूनाथ पाटील, परिचारिका ग्रेस काकडे, नंदे, दाऊद मुजावर, गुरबसप्पा अल्लापूरे, विश्वनाथ डिग्गे, रत्नाकर डिग्गे आदी डॉक्टरांच्या टीमने जखमींवर तातडीने प्राथमिक उपचार केले. रात्री उशिरापर्यंत घटनास्थळी पंचनामा करण्याचे काम सुरू होते. सायंकाळी सातच्या सुमारास मृतांचे व जखमींचे नातेवाईक अक्कलकोटला आले. त्यानंतर ओळख पटवण्याचे काम हाती घेण्यात आल्याचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत पुजारी यांनी सुराज्यशी बोलताना सांगितले. घटनास्थळाला ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, तहसीलदार बाळासाहेब सिरसट आदींनी भेट देऊन जखमींना आधार दिला.

रक्ताचा सडा...

अपघातानंतर घटनास्थळी रक्ताचा सडा पडला होता. मृतदेह छिन्न-विछिन्न झाले होते. जमखींमधून एक आक्रोश सुरू होता. हा प्रसंग पाहून शिरवळवाडीच्या ग्रामस्थांना मोठा धक्का बसला. त्यातूनच मदत कार्य हाती घेतले. नागरिकांनी व पोलिसांनी मिळेल त्या वाहनांमधून जमखींना अक्कलकोट व नंतर सोलापूरच्या शासकीय रूग्णालयात हलवले.मन विषण्ण झालेले असतानाही ग्रामस्थांनी मदतीची मानवता दाखवली.

सिव्हिलमध्ये आक्रोश...

सोलापूर- जखमींना रात्री सोलापूरच्या शासकीय रूग्णालयात अक्कलकोटहून आणले गेले. दरम्यान त्यांचे नातेवाईक अक्कलकोटला आले होते. जखमींना सोलापूरला हलवण्यात आल्याचे कळताच नातेवाईकांनी सोलापूरकडे धाव घेतली. जखमींसोबत शिरवळवाडीचे बरेच कार्यकर्ते आले होते.नातेवाईकही आल्यानंतर सिव्हिलमध्ये मोठी गर्दी झाली.नातेवाईकांनी हंबरडा फोडला.पण कार्यकर्त्यांनी त्यांना धीर दिला.

राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार जुलै महिन्यात

दिल्ली दौऱ्यानंतर देवेंद्र फडणवीसांचे सूचक विधान

सुराज्य/मुंबई

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला आज एक वर्ष पूर्ण झालं आहे. परंतु अद्याप दुसऱ्या टप्प्यातील मंत्रिमंडळ विस्तार झालेला नाही. वर्षभरात अनेकवेळा एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी अनेकवेळा दिल्लीच्या वाऱ्या केल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील मंत्रिमंडळ विस्तार लवकरच होईल, अशी नेहमीच प्रतिक्रिया देण्यात येत होती. परंतु कालच्या दिल्ली दौऱ्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार जुलै महिन्यात होणार असल्याचे विधान केले आहे.

देवेंद्र फडणवीस यांना दिल्ली दौऱ्यासंदर्भात प्रश्न विचारण्यात आला, तेव्हा ते म्हणाले की, राज्याचे अनेक प्रश्न असतात त्यासंदर्भात आम्हाला भेट घ्यावी लागते, त्या प्रश्नांचा पाठपुरावा करावा लागतो. अनेक वेळेला त्यासंदर्भात बैठका देखील असतात. आम्हाला मंत्रिमंडळाचा विस्तार करायचा आहे. मुख्यमंत्री त्याबद्दल निर्णय येतली, पण मला वाटतं जुलै महिन्यांमध्ये विस्तार करू. यावेळी त्यांना केंद्राचा आधी की राज्याचा आधी असा प्रश्न विचारल्यावर फडणवीस यांनी उत्तर दिले की, केंद्राच्या आणि राज्याच्या विस्ताराचा काही आपआपसात संबंध नाही. केंद्राचा विस्तार कधी होणार हे आम्हाला माहीत नाही. आम्ही राज्याच्या विस्तारात जास्त लक्ष देत आहोत, असे फडणवीस म्हणाले. दरम्यान, राज्यमंत्रिमंडळाचा दुसऱ्या टप्प्यातील विस्तार गेल्या वर्षभरापासून रखडला आहे.

दोघांना मोक्कामध्ये आठ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

सुराज्य/सोलापूर

मोहोळ तालुक्यातील चिंचोलीकाटी येथे राहणाऱ्या दोघांना मोक्कामध्ये आठवर्षे सक्तमजुरीची शिक्षा व दहा लाख रुपयांचा दंड प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ.शब्बीर अहेमद औटी यांनी ठोठावला आहे.

किसन शामराव काळे व लखन उर्फ लक्ष्मण उर्फ लक्या काळे अशी शिक्षा ठोठावण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत तर दीपक नागनाथ धोत्रे याची सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. यामध्ये फिर्यादी संजय अमेरिका गुप्ता (वय २८, रा. गोपीनाथ नगर, कोंडी फाटा) हे त्यांच्या कुटुंबासह राहण्यास होते तेथेच त्यांचे भंगारचे दुकान होते.३० डिसेंबर २०१४ रोजी रात्री दुकान बंद करून फिर्यादी व त्यांचे कुटुंबीय झोपले होते. मध्यरात्री दोनच्या सुमारास त्यांच्या घराचा दरवाजा वाजल्याने त्यांना जाग आली. त्यावेळी आरोपींनी बाहेरून आम्ही तालुका पोलीस ठाण्यातून आलो आहोत असे सांगितले. परंतु फिर्यादीला संशय आल्याने त्यांनी दरवाजा उघडला नाही. त्यांनी दरवाजाच्या फटीतून पाहिले असता आरोपी तलवारीने दरवाजा तोडत होते. काही वेळाने त्यांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर चोरट्यांनी फिर्यादीला पकडले व तलवारीने वार करत असताना त्यांनी कपाटाची चावी देऊन काय पाहिजे ते घ्या असे सांगितले. त्यावेळी फिर्यादीची पत्नी मोबाईलवरून फोन करत असताना चोरट्याने तिच्याजवळ जवळील फोन हिसकावून घेतला व गळ्यातील बनावट मंगळसूत्र काढून घेतले. चोरटे कपाट उघडत असताना बाहेरून आवाज आल्याने चोरटे तेथून पळून गेले. त्यावेळी त्यातील दोघांना फिर्यादीने ओळखले. चोरट्यांनी जाताना शेजाऱ्यास मारहाण केली आहे. त्याचप्रमाणे त्यांनी दत्तात्रय गवळी (रा. अकोली काटी) यांनाही मारहाण करून रोख रक्कम, मोटरसायकल व मोबाईल जबरदस्तीने नेला होता तसेच श्रवण कुमार यादव यांचीही दहा हजारांची रोकड व दोन मोबाईल असा एकूण ४० हजारांचा मुद्देमाल लुटून नेला, अशी फिर्याद तालुका पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. आरोपींविरुद्ध अनेक ठिकाणी गुन्हे असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध मोक्का कायद्यान्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. या खटल्यात सरकारतर्फे एकूण १८ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये अतिरिक्त पोलीस संचालक के एल बिष्णोई तसेच कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रितेश कुमार, सहाय्यक पोलीस अधीक्षक कृष्णकांत उपाध्याय यांच्यासह अनेकांच्या साक्षी झाल्या होत्या. सरकार पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. औटी यांनी आरोपी किसन काळे व लखन काळे यांना दोषी धरून आठ वर्षे सक्त मजुरी व प्रत्येकी पाच लाख रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

यात सरकारतर्फे ॲड. माधुरी देशपांडे यांनी तर आरोपीतर्फे एस आर गडदे यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून पोलीस नाईक सुमन वाडे यांनी काम पाहिले.

महाआयटीचे सर्व्हर डाऊन; दाखल्यांसाठी १५ दिवसांची मुदतवाढ

राज्य शासनाचा निर्णय

सुराज्य/सोलापूर

शिक्षण व नोकरीसाठी लागणारे विविध प्रकारचे दाखले वितरित करण्याची संख्या वाढल्याने महाआयटीच्या सर्व्हरवर ताण आला असून यामुळे दाखले वितरित होण्यास विलंब लागत आहे. यामुळे विद्यार्थी, पालक व नोकरीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांची गैरसोय होत असून याविषयी त्यांच्यातून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन व तांत्रिक विभागाने विभागाने ही अडचण लक्षात घेऊन विद्यार्थी व नोकरी इच्छुक उमेदवारांची गैरसोय टाळण्यासाठी विविध प्रकारचे दाखले सादर करण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी. यासंदर्भात सर्व शासकीय कार्यालये, महामंडळे व शिक्षण संस्थांना कळविण्यात यावे, सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव पराग जैन यांनी सर्वच मंत्रालयाच्या सचिवांना पत्राद्वारे कळविले आहे. सद्यस्थितीमध्ये शासकीय सेवांचा उपयोग करणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या पूर्वीपेक्षा चार ते पाच पटींनी वाढली असल्याने त्याचा महाआयटीच्या सर्व्हरवर अतिरिक्त भार पडत आहे. यामुळे दाखला ऑनलाईन पद्धतीने निर्गमित होण्यास १५ ते २० मिनिटांचा वेळ लागत आहे. सर्वसाधारणपणे दिवसभरात ५० ते ६० हजार दाखले निर्गमित होतात. परंतु सद्यस्थितीमध्ये विविध विभागांत नागरिकांना शैक्षणिक प्रवेश, नोकर भरती इत्यादींसाठी दाखल्याची तातडीने आवश्यकता आहे. परंतु दाखले ऑनलाईन पद्धतीने निर्गमित करण्यास उशीर होत असल्याने नागरिकांची अडचण होत आहे. म्हणून ही अडचण दूर करण्यासाठी संबंधित शैक्षणिक प्रवेश परीक्षा, नोकर भरती, इत्यादींसाठी दाखले स्वीकारण्याची अंतिम तारीख किमान १५ दिवसांनी वाढविण्यात यावी, याबाबत आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या शैक्षणिक संस्था, क्षेत्रीय कार्यालये, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, शासनाच्या अधिसूचनेद्वारे अधिसूचित करण्यात आलेल्या संस्था, आयोग यांना निर्देश देण्यात यावेत, असे प्रधान सचिवांच्या पत्रात म्हटले आहे

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

हे फुगे फोडलेच पाहिजेत!

कल्याण
237-26-240

सोलापुरातील पहिल्या आयटी पार्कचे २ ऑगस्ट रोजी भूमिपूजन

आर्यन्स ग्रुप सोलापुरात करणार ८०० कोटींची गुतंवणूक

खा. शरद पवारांची उपस्थिती राहणार : महेश कोठे यांची घोषणा

सुराज्य/सोलापूर

सोलापुरातील पहिल्या आयटी पार्कची घोषणा माजी महापौर महेश कोठे यांनी केली आहे. आर्यन्स ग्रुपच्या माध्यमातून सोलापुरातील डोणगांव रोडवरील ६५ एकर जागेमध्ये खा. शरद पवार यांच्या हस्ते या आयटी पार्कचे भूमिपूजन केले जाणार असल्याची माहिती माजी महापौर महेश कोठे आणि आर्यन्स ग्रुपचे सीईओ मनोहर जगताप यांनी पत्रकार परिषदेत दिली. यामध्ये आयटीसी संलग्न अशा विविध कंपन्या आणल्या जाणार आहेत. तसेच रोबोट तयार करणाऱ्या कंपनीचा देखील समावेश आहे. येत्या पाच ते सहा महिन्यात प्रत्यक्ष कंपनी सुरू होऊन दहा ते पंधरा हजार तरुणांना रोजगार मिळणार आहे.

आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनी सोलापूर मध्ये उभारत असलेले हे अत्याधुनिक आयटी पार्क अनेक दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे. यामुळे शहरात आयटी क्षेत्रातील उद्योगांना मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे. या आयटी पार्कच्या माध्यमातून मोठ्या आयटी कंपन्या, आयटी क्षेत्रातील स्टार्टअप्स, उद्योजक आणि याच्यांशी संबंधित उद्योगांना आकर्षित केले जाणार आहे. या माध्यमातून सोलापूर मध्ये माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योगांसाठी एक पोषक वातावरण तयार होणार असल्याचे जगताप यांनी यावेळी सांगितले. आयटी पार्क बरोबरच आर्यन्स ग्रुप आयटी क्षेत्रात काही महत्त्वाच्या प्रकल्पांवर देखील काम करत आहे.

कंपनी पूर्णतः भारतीय बनावटीचे सर्च इंजीन बनवणार आहे. कंपनीसाठी हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. कारण गुगल किंवा इतर सर्च इंजीन देशाबाहेरील आहेत. ज्यामुळे भारताच्या दृष्टीने हा एक सुरक्षेचा विषय आहे. याबरोबरच कंपनी भारतीय बनावटीचे वेब ब्राउजर देखील बनवत आहे. जे पूर्णपणे सुरक्षित असेल. आयटीपार्क सह इतर प्रकल्पासाठी जागा मिळाल्यास ८०० कोटी पेक्षा जादा गुंतवणूक करण्याचा कंपनीचा मानस असल्याचे जगताप यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस कंपनीचे संचालक संजय शेंडगे, किरण लोहार, माजी नगरसेवक प्रथमेश कोठे, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, विनायक कोंड्याल, कुमुंद अंकाराम, शशिकांत कैंची, विद्या लोलगे यांची उपस्थिती होती.

मी केले तुम्ही करून दाखवा : भूमिपूजन झाल्यानंतर तीन महिन्यात सोलापूरच्या लोकांना इथे नोकरी मिळेल. पहिल्या टप्प्यात टेक्निकलच्या दीड हजार तर नॉन टेक्निकलच्या तीन हजार लोकांना सुरुवातीच्या वर्षांमध्ये काम मिळेल. तीन वर्षांमध्ये जवळजवळ दहा १० ते १५ हजार रोजगारांच्या संधी मिळणार आहे. मी गेली सहा वर्षांचे स्वप्न पुर्ण करत करून दाखवल आहे. आता मी केले आता इतर राजकीय पक्षाच्या लोकांनी करून दाखवा आणि शहराच्या विकासात भर घालण्याचे आवाहन महेश कोठे यांनी यावेळी केले.

आर्थिक विकासाला चालना

आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनी शहरामध्ये आयटी पार्क उभारत आहोत. ही आमच्यासाठी एक आनंदाची गोष्ट आहे. शरद पवार त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि प्रेरणेमुळे आम्हाला हे साध्य करणे शक्य झाले आहे. या आत्याधुनिक आयटी पार्क च्या माध्यमातून या भागात आर्थिक विकासाला चालना तर मिळणार आहेच त्याबरोबरच रोजगाराच्या अनेक संधी देखील निर्माण होणार आहेत.

- मनोहर जगताप (सीईओ आर्यन्स ग्रुप सोलापूर)

वाट खडतरच...

राज्यात सत्ता स्थापन करून शिंदे-फडणवीस सरकारला एक वर्ष पूर्ण झाले. त्याविषयीची चर्चा राजकीय जाणकारांमध्ये सुरू आहे. वर्षभरातील कामकाजाचा लेखाजोखा मांडतानाच शिंदे गट-भाजपा युतीच्या पुढच्या भवितव्याविषयीचे गणित आखले जात आहेत. शिवसेनेतील बंड आणि ५० आमदारांच्या पाठबळावर शिंदे यांना मुख्यमंत्रिपदाची लॉटरी लागली आणि गेल्या वर्षभरात सारे फासे त्यांना अनुकूल असेच पडत गेले. शिवसेना हे नाव मिळाले, पक्षांतरबंदी कायद्याखाली अपात्रतेच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयातही दिलासाच मिळाला. प्रशासकीय पातळीवर ठसा उमटविता आला नसला तरी राजकीय आघाडीवर स्वत:ची छाप पाडली. 'हे सरकार सर्वसामान्यांचे गोरगरिबांचे शेतकऱ्यांचे. समृद्धी महामार्ग बदल घडविणार. जगाला हेवा वाटावा अशी मुंबई करणार. मी देणारा आहे, घेणारा नाही, हे शिंदे यांचे पालुपद गेले वर्षभर सुरू आहे. घोषणांचा पाऊस, निर्णयांचा धडाका आणि राज्य पिंजून काढताना अवघ्या वर्षभरातच आपल्या कार्याचा ठसा उमटवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्याच वेळी सहकारी आमदार आणि भाजप अशा दोयांनाही सांभाळण्याची तारेवरची कसरत त्यांना करावी लागली. शिवसेनेतील बंडानंतर नारायण राणे वा छगन भुजबळ यांची मुख्यमंत्रिपदाची इच्छा पूर्ण झाली नाही. या उलट शिंदे यांना बंडानंतर थेट मुख्यमंत्रिपद मिळाले. शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह मिळाले. ठाकरे गटात फूट पाडून आपल्या गटाचा अधिकाधिक राजकीय फायदा कसा होईल यावर शिंदे यांचा वर्षभर भर राहिला आहे. उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे किंवा अन्य नेत्यांच्या टीकाटिप्पणीला उत्तर देण्यात व ठाकरे गटात फूट पाडण्यातच शिंदे यांचा अधिक वेळ खर्ची झाला आहे. विकास कामांवर भर देतानाच पायाभूत सुविधा आणि कृषी क्षेत्राकडे अधिक लक्ष केंद्रित केले. शेतकऱ्यांच्या खात्यात वर्षाला सहा हजार रुपये जमा करणे, एक रुपयात पीक विमा योजना, अतिवृष्टीग्रस्तांना एनडीआरएफच्या दुप्पट मदत देणे, सततचा पाऊस नैसर्गिक आपत्ती समजून शेतकऱ्यांना मदत देण्यासारख्या निर्णयासोबतच विविध योजना

आणि निर्णयांच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना खूश करण्याचा प्रयत्न केला. कोणतीही नैसर्गिक आपत्ती आल्यावर धावून जायचे हे शिंदे यांचे वैशिष्ट्य. भाजपाच्या मदतीवर मुख्यमंत्रिपद मिळाल्याने साहजिकच शिंदे यांनी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी चांगलेच जुळवून घेतले. पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांच्याशी जवळीक साधली. मोदी-शहा यांना अपेक्षित असे निर्णय घेतले. दिल्लीत भाजप नेत्यांचा विश्वास संपादन केला असला तरी राज्यातील भाजप नेत्यांशी तेवढी नाळ जोडली गेली नाही. शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यातील भाजप नेत्यांनी वेगळा सूर लावला. शिंदे गट आणि भाजपमध्ये विसंवाद वाढत गेला. चंद्रकांत पाटील वा चंद्रशेखर बावनकुळे या आजी-माजी प्रदेशाध्यक्षांची शिंदे यांच्याबाबतची विधाने हे राज्यातील भाजपशी तेवढे सख्य नाही हेच दर्शविणारी होती. त्यातच अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीमुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजप नेते खवळले. मुख्यमंत्र्यांचे 'पुत्र प्रेम' त्यांना राजकीयदृष्ट्या अडचणीचे ठरते, असे राजकीय वर्तुळात बोलले जाऊ लागले. खासदार श्रीकांत शिंदे यांचे वाढते महत्त्वही शिवसेनेच्या शिंदे गटातील ज्येष्ठ नेत्यांना खुपते. कल्याण मतदारसंघात भाजपावर कुरघोडी करण्याच्या नादात शिंदे गट आणि भाजपमध्ये कटुता निर्माण झाली. त्यातूनच मुख्यमंत्री पुत्राला राजीनामा देण्याची भाषा करावी लागली. त्यातूनच जाहिरात पुराण गाजले. याशिवाय काही सहकारी मंत्र्यांच्या उद्योगांमुळेही शिंदे अडचणीत आले. त्यांना आवरणेही शिंदे यांना शक्य झालेले नाही. शिंदे यांनी वर्षभर रेटून नेले. पण त्यांची खरी कसोटी यापुढील काळात लागणार आहे. अद्याप महानगरपालिका, नगरपालिका वा जिल्हा परिषदांच्या निवडणुका रखडल्या आहेत. त्या पावसाळ्यानंतर झाल्यास शिंदे सरकारबाबत जनमताचा अंदाज येऊ शकेल. पुढील वर्षी लोकसभा आणि पाठोपाठ विधानसभा निवडणुकांचे आव्हान असेल. शिंदे यांच्या वर्षभराच्या कामगिरीचे मूल्यमापन केल्यास जमा कमी आणि खर्च जास्त असेच चित्र दिसते. आता महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पुढचे पोलिटिकल करिअरचा. शिवसेना मिळाली पण पक्ष संघटन अजूनही कुठेच दिसत नाही. २०२४च्या निवडणुकींत शिंदे यांचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा असणार नाही, असे फडणवीस एका मुलाखतीत म्हणाले. यावरून फडणवीसांची तमन्ना राज्याला कळाली.भाजपाशी जागा वाटपाचे सूत्र कसे ठरणार? आगामी निवडणुकींची रणनीती अजून ठरलेली नाही.ही स्थिती पाहाता राजकीयदृष्ट्या शिंदे गटाची पुढची वाट खडतरच दिसते.

शैक्षणिक

उच्च शिक्षणाची नवी दिशा

उच्च शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल करण्याची गरज अनेक तज्ञांकडून व्यक्त केली जात होती. त्याच अनुषंगाने उच्च शिक्षणात रचनात्मक बदल करण्यासाठी केंद्र सरकारने के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० तयार करून संपूर्ण देशपातळीवर एकसमान शिक्षण पद्धती लागू करण्याचे ठरविले. महाराष्ट्र शासनाने शासन निर्णयाद्वारे शैक्षणिक वर्ष दोन २०२३ -२४ पासून सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे, समूह विद्यापीठे व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये इत्यादी सराष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० लागू करण्याचे निर्देश दिलेले आहेत. विशेषत: सर्व विद्यापीठे व स्वायत्त महाविद्यालये चालू शैक्षणिक वर्षापासून हे धोरण लागू करण्यास सज्ज झाली आहेत. या धोरणामध्ये पदवी अभ्यासक्रमाची संपूर्णपणे पुनर्रचना केली आहे. २१व्या शतकात गरजेनुसार व बाजार मागणीनुसार शिक्षण तयार करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करून रोजगारभिमुख शिक्षण निर्माण करण्यात नवीन शैक्षणिक धोरण महत्त्वाची भूमिका बजावेल.

विद्यार्थी केंद्रित अभ्यासक्रम आराखडा, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, बहु शाखा शिक्षण पद्धती, बहु प्रवेश व बहु निर्गमन, अध्ययन निष्पत्तीवर आधारित शिक्षण, रोजगारभिमुख शिक्षण, विषय निवडीस लवचिकता इत्यादी या शैक्षणिक धोरणाची ठळक वैशिष्ट्ये म्हणावे लागतील. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थी केंद्रित अभ्यासक्रम आराखड्यावर भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या शाखेतील मुख्य विषयाबरोबरच व्यावसायिक शिक्षण, कौशल्यावर आधारित शिक्षण तसेच प्रत्यक्ष औद्योगिक संस्थांमध्ये कामाचा अनुभव आणि प्रशिक्षण इत्यादी शिक्षण उपलब्ध होणार आहे. विद्यार्थी सतत अभ्यासात कार्यरत राहील आणि त्याची वर्गातील उपस्थिती वाढेल याकडे विशेष लक्ष दिले आहे.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हे या धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट मानले जाते. विद्यार्थ्यांच्या क्षमता ओळखून त्यांचा सर्वांगीण विकास करणे, एका शाखेतून दुसऱ्या शाखेतील विषय निवडीस स्वातंत्र्य देणे उदाहरणार्थ विज्ञान शाखेतील एखाद्या विद्यार्थ्यास अर्थशास्त्र हा विषय शिकावयाचे असल्यास त्यास विषय निवडीचे मुभा दिले जाईल. विद्यार्थ्यांचे संवाद कौशल्य, लेखन कौशल्य, वादविवाद कौशल्य, विकसित करून त्याचे भाषा कौशल्य सुधारणा करण्याची सोय या नवीन अभ्यासक्रम आराखड्यात दिसून येते. मूल्य शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, पर्यावरण शिक्षण, तंत्रज्ञानावर आधारित उपाय शिक्षण, कला योग, खेळ इत्यादी विविध उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकास करण्याचे लक्ष्य या नवीन शैक्षणिक धोरणात आखले आहे.

या धोरणांमध्ये विद्यार्थ्यांना बहुप्रवेश व निर्गमन करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थी प्रथम वर्ष शिकून थांबल्यास त्यास त्या शाखेचे प्रमाणपत्र मिळणार आहे. विद्यार्थ्यांनी दोन वर्ष शिकून शिक्षण थांबविल्यास त्यासाठीचे डिप्लोमा प्रमाणपत्र मिळेल. तीन वर्ष म्हणजे सहा सेमिस्टर ठरवून दिलेले क्रेडिटस् मिळवून पूर्ण केल्यास त्यास पदवी प्रमाणपत्र मिळेल. विद्यार्थ्यांना आणखी त्या विषयाचे सखोल अभ्यास व संशोधन करावयाचे असल्यास त्यास चौथ्या वर्षाची सुविधा उपलब्ध होणार आहे व त्यास ऑनर्स आणि संशोधनासहित पदवी बहाल केली जाईल. चार वर्षाचा संशोधनासहित पदवी विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाल्यास तो पीएच. डी. करण्यास ही पात्र असेल. तसेच विद्यार्थी कोणत्याही स्तरावर पूर्वी शिक्षण थांबवलेले असेल आणि त्यास परत शिक्षण चालू करावयाचे असल्यास त्या तीन वर्षात परत प्रवेश घेता येईल. पदवी पूर्ण करण्याचा जास्तीत जास्त कालावधी सात वर्षाचा असेल. तसेच बहुविद्या शाखा निवडीसाठी विद्यार्थ्यांना एकाच वेळी विविध संस्थांमध्ये शिक्षण घेणे आता शक्य झाले आहे. परदेशी उच्च शिक्षण ही आता सोईस्कर होईल. परदेशी उच्च शिक्षणासाठी ज्यादाचे एक वर्ष द्यावे लागणार नाही.

विद्यार्थ्यांना ऑनलाइन कोर्स करणेही आता शक्य होईल. या अंतर्गत स्वयंम्सारख्या पोर्टलवरून अनेक ऑनलाईन कोर्स विद्यार्थ्यांना करता येतील ज्याचे क्रेडिटस् प्रत्यक्षरीत्या अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटमध्ये जमा होतील. परंपरागत शिक्षण पद्धतीमध्ये पुस्तके ज्ञानावर भर दिल्याने विद्यार्थ्यांना कौशल्य विकासास वाव मिळत नव्हता. परंतु नवीन शैक्षणिक धोरणात परंपरागत शिक्षणाबरोबर व्यावसायिक शिक्षण, कौशल्य आधारित शिक्षण, औद्योगिक संस्थांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव व प्रशिक्षण इत्यादीमुळे विद्यार्थी अधिकाधिक रोजगारभिमुख होईल. अभ्यासक्रम व उद्योग संस्थांमध्ये आवश्यक कौशल्य यातील अंतर कमी होऊन मागणीनुसार मानव संसाधनाचा पुरवठा तयार होईल. शैक्षणिक संस्था स्थानिक पातळीवर गरजा लक्षात येऊन असे कौशल्य वृद्धिंगत अभ्यासक्रम कोर्स तयार करू शकतात. शिक्षणसंस्था व औद्योगिक संस्था यांच्यातील सहयोग व समन्वयातून विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासास चालना दिले जाईल. शाश्वत शिक्षण आधारित अभ्यासक्रम आराखड्याचे समाजातील सर्वच स्तरातून विशेष कौतुक होत आहे. भरभक्कम अभ्यासक्रम आराखड्याबरोबरच केंद्र शासन व राज्य शासनास शैक्षणिक पायाभूत सुविधा व मानव संसाधन सुविधा मुबलक उपलब्ध करून दिल्यास नवीन शैक्षणिक धोरण उच्च शिक्षणाची नक्कीच नवी दिशा ठरेल.

- डॉ. अविनाश जम्मा.

टुडेज् ब्लॉग

पांडुरंग कांती, दिव्य तेज झळकती...

सकाळी सकाळी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठी साहित्यिक विंदा करंदीकर यांची कविता आठवली.

पंढरपूरच्या वेशीबाहेर आहे, एक छोटी शाळा
सर्व मुले आहेत गोरी, एक मुलगा कुट्ट काळा
खूप करतो दंगा मस्ती, खोड्या करण्यात आहे अट्टल
मास्तर म्हणतात करणार काय? न जाणो असेल विठ्ठल...

पांडुरंग हे सगळ्या महाराष्ट्राचे लाडके दैवत. शैव आणि वैष्णव या दोन्हीही सांप्रदायांना सारखेच प्रिय. आपण मराठी माणसे आपल्या देवाशी इतके सख्य करतो की आपल्या मित्रासारखी त्याचीही चेष्टा आपण करतो. म्हणूनच विंदांना ही कविता सुचली असावी. या कवितेत पांडुरंगाच्या काळ्या रंगावरून त्याला चिडवण्यात विंदांची सख्यभक्तीच मला जास्त दिसली.

पंढरपूरला पांडुरंगाची जी मूर्ती आहे ती खरेतर काळ्या पाषाणाची आहे. 'पांडुरंग' म्हणजे पांढरा रंग. पांढरा हा शब्दच मुळी 'पांडु' या शब्दापासून आलेला आहे. त्या काळ्या रंगाच्या मूर्तीतून अत्यंत दिव्य अशा प्रकारची तेजस्वी प्रभा बाहेर पडत असल्याचे भक्तांना दिसत आलेली आहे. बरे ही अनुभूती फक्त संत मंडळी घेतात काय? नाही. पांडुरंग हा सर्वसामान्य माणसाचा देव आहे. आपल्या वारकरी भक्तांसारखा भाजी भाकरीवर राजी असणारा हा देव आहे. त्यामुळे पांडुरंगाच्या मूर्तीतून चैतन्यमय असणारे हे तेज आपण सर्वसामान्यही सहज बघू शकतो. कधीतरी पंढरपूरला गेल्यावर सगळे व्यापताप विसरून. स्वतःचा देह, स्वतःला विसरून एकदा फक्त आपण विठ्ठलाकडे नीट डोळे भरून बघितले की, त्या काळ्या विठ्ठलातून अत्यंत दिव्य अशा प्रकारची प्रभा, तेज बाहेर पडत असल्याचे आपल्यालाही दिसेल. आपण बाह्य जगात फार गुंततो. तेच गुंतणे आपण देवासमोरही घेऊन जातो. मग दर्शन हा फक्त एक उपचार उरतो. दर्शन घेणे, आपल्या मागण्या मागणे आणि बाहेर पडणे यात आपल्या चित्तात त्याच्याविषयी काय आणि किती प्रेम उत्पन्न झाले? या प्रश्नाचे उत्तर आपण शोधतच नाही. पण स्वानुभवावरून सांगतो की, तुमच्या माझ्यासारख्या सर्वसामान्य प्रापंचिक माणसालाही ही दिव्य प्रभा अनुभवण्याचा हा अनुभव येणे फार कठीण नाही. 'देवाच्या सख्यासाठी, पडो जिवलगांच्या तुटी' या स्थितीपर्यंत अगदी आपण नाही पोहोचलो तरी क्षणभर स्वतःला विसरून त्याच्या 'दर्शना' साठी आपण आलोय ही भावना मनात स्थिरावली की आपोआप ती मूर्ती चैतन्यरूप होते आणि त्यातून एक दिव्य तेज, अलौकिक प्रभा बाहेर झळकत असल्याचा ज्ञानोबामाऊलींचा अनुभव आपणही घेऊ शकतो.

मी पहिल्यांदा तिरूपतीला गेलो होतो तेव्हा हा अनुभव मला तिथेही आला होता. तिथली बालाजीची मूर्तीही अशीच काळ्या पाषाणातली आहे. मी पहिल्यांदा तिथे जातोय म्हटल्यावर तिथे नेहमी जाणाऱ्या माझ्या एका मामेभावाने मला एक टीप दिली. तो म्हणाला, 'राम, तू मुख्य सभामंडपात जाशील ना तेव्हा तिथे खूप गर्दी असते. बालाजीसमोर गेल्यानंतर तिथे डोळे भरून पाहीपर्यंत आपल्याला तिथली मंडळी थांबू देत नाहीत. तितका वेळच नसतो. तेव्हा तू मुख्य मंडपात प्रवेश करशील त्या क्षणापासून सरळ बालाजीकडे लक्ष ठेव. तिथे बालाजीकडे जाताना थोडा उतार आहे, त्यामुळे दूरून तुला दर्शन होत राहील. अगदी पुढे मूर्तीसमोर जाईपर्यंत दोन तीन मिनिटे तुला डोळेभरून दर्शन घेता येईल. इतर बहुतांशी मंडळी त्या मंडपात गेल्यानंतर सुरूवातीला तिथे असलेले सोने चांदी जड जवाहिरेच निरखत बसतात आणि बालाजीसमोर आल्यानंतर तिथे थांबू न दिल्याबद्दल, त्याचे डोळा भरून दर्शन न झाल्याबद्दल मंदिर व्यवस्थापनाला दोष देतात. ते सगळे वैभव आपल्याला प्रदक्षिणा करतानाही बघता येते. मुख्य मंडपात फक्त बालाजीच.

मी त्याचा सल्ला ध्यानात ठेवला आणि अगदी तसेच केले. बालाजीची मूर्ती मला चांगली दोन तीन मिनिटे निरखून बघता आली. त्या मूर्तीतूनही अशीच दिव्य प्रभा बाहेर पडतानाचा हा जन्म धन्य करणारा अनुभव माझ्यासारख्या सर्वसामान्य प्रापंचिकाला आला. त्यानंतर मी दोन तीन वर्षातच पंढरपूरजवळ सांगोला येथे नोकरीनिमित्त गेलो. तिथे गेल्यावर काय? पंढरपूर फक्त पंचवीस किलोमीटरवर. अगदी अर्ध्या तासात इकडून तिकडे आणि तिकडून इकडे जाणे येणे व्हायचे. पांडुरंगाचे मनसोक्त दर्शन दरवेळी व्हायचे. दरवेळी माझ्या लक्षात आले की त्या मूर्तीतून बाहेर पडणारी प्रभा आपण बघू शकतोय. त्यासाठी स्वतःला, स्वतःचे इतर व्याप ताप विसरण्याची विशेष कवायत मला करावी लागत नाही. माझा हा मित्र एव्हढा दयाळू आहे की त्याच्यासमोर गेल्यावर तो आपसूकच माझ्या मनात इतर कुठलीही भावना राहू देतच नाही. फक्त तो आणि मी हेच दोघे या जगात उरलोत. आम्ही दोघे आणि त्याचा माझा शब्देवीण संवादू. हा अनुभव तर आला. आता तो आणि मी ह्या दोन व्यक्ती नाहीतच, तो आणि मी एकच आहोत.

'क्षेम देऊ गेले तव मी ची मी एकली' हा ज्ञानोबामाऊलींचा अद्वैतानंदाचा अनुभव आलेला नाही. तो अनुभव यावा असे विशेष मागणेही नाही. तसा अट्टाहासही नाही. कारण त्याच्या माझ्या नात्यातले आजवरचे सगळे आनंदी अनुभव, त्यानेच, मी न मागता सुद्धा दिलेले आहेत. मग हा अनुभव सुद्धा तोच देईल. योग्य वेळी. या जन्मात, पुढच्या जन्मात, कदाचित आजही. तो जगन्नियंता आहे. त्यालाच हे सगळे ठाऊक आहे. भक्ताने कसलाही अट्टाहास न धरता फक्त त्याचे सान्निध्य अनुभवत रहावे यावीना दुसरा आनंद कुठलाच नाही हे आता मला कळलेले आहे.

- राम किणीकर

जन्म हा अखेरचा

कायार्पितस्थल

शरीर शिवार्पण केले तर हे घडते. शिवाला शरीर अर्पण केल्याने शिवरुप लाभते. मनुष्याने केवळ 'शैव' राहू नये तर 'शिव' व्हावे, 'वैष्णव' राहू नये तर 'विष्णू' व्हावे. 'शाक्त' राहू नये 'शक्ती' व्हावे. 'गाणपत्य' राहू नये 'गणपती' व्हावे, 'जैन' राहू नये 'जिन' व्हावे, 'बौद्ध' राहू नये 'बुद्ध' व्हावे, 'ख्रिश्चन' राहू नये 'ख्रिस्त' व्हावे. याचा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे. शिव आणि विष्णू यांच्यात कधी संघर्ष झाला आहे काय? शक्ती आणि गणपती, जिन आणि बुद्ध यांच्यात संघर्ष झाल्याचे उदाहरण नाही. परंतु शैव आणि वैष्णव मात्र एकमेकांशी भरपूर भांडले आहेत. तसेच शाक्त आणि गाणपत्य, जैन आणि बौद्ध यांच्यात भांडणे झाली आहेत. देवता भांडत नाहीत, त्यांचे उपासक मात्र परस्परांशी भांडतात. हे कशामुळे घडते? तर उपासक आपल्या देवतेशी समरस न झाल्यामुळे. आपल्या देवतेचा अवश्य जयजयकार करावा. परंतु त्याबरोबरच देवतेशी समरस कसे होता येईल याचाही विचार करावा अन्यथा तत्त्व बाजूला राहते आणि देवतेच्या नावाने समाजात गोंधळ माजतो.

शिव म्हणजे सर्वांचे कल्याण करणारा. शिवोपासकाच्या मनात सर्वांच्या कल्याणाची इच्छा उत्पन्न झाली तरच ते 'शिव' होतील अन्यथा केवळ 'शैव' राहतील. याप्रमाणे विष्णू, जिन, बुद्ध यातील तत्त्वे जाणून त्यांच्या उपासकांनी केवळ वैष्णव, जैन, बौद्ध व्हावे. देवाच्या नामाचा अभिमान कितीही वाहिला तरी तो आपल्याला मूलतत्त्वापर्यंत घेऊन जाणार नाही. येशू ख्रिस्ताने स्वतःचे शरीर क्रूसावर खिळवून परमेश्वराला पूर्ण समर्पण केले. शरीर क्रूसावर अर्पण करणे आणि शरीरावर क्रूस मिरवणे यात खूप अंतर आहे. सामान्यांच्या लक्षात हेच येत नाही आणि त्यामुळे धर्मतत्त्वांची अकारण बदनामी होते. सांगण्याचे तात्पर्य असे की, तुम्ही शैव असा की वैष्णव, जैन असा की बौद्ध, ख्रिश्चन असा की अन्य पंथीय, आपापल्या देवतेला समर्पित झाले पाहिजे. म्हणून जो शिवाला आपले शरीर अर्पण करतो तो शिवरुप होतो, असे या ठिकाणी म्हटले आहे.

इंद्रियप्रीतिहेतूनि विषयासंगजानि च ।
सुखानि सुखचिद्रुपे शिवयोगी निवेदयेत् ।।१७.३६।।

शरीर अर्पण करणे याचा अर्थ शरीरातील इंद्रियांची सुखे अर्पण करणे, इंद्रिये आणि विषय यांच्या संयोगातून जे सुख प्राप्त होते ते शिवार्पित केले पाहिजे. ही सुखे देखील नैवेद्य म्हणून शिवाला अर्पण करावीत. केवळ खाद्यपदार्थ अथवा वस्त्रप्रावरण शिवाला अर्पण करावीत असे नाही; तर आपण जे काही भोगतो ते आणि त्यापासून जे मिळते, ते हे सारे शिवाला अर्पण केले पाहिजे. **(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

मणिपूरची घुसमट थांबविणार की लांबविणार?

मणिपूरमध्ये गेल्या दोन तीन महिन्यात हिंसाचार, जाळपोळीच्या घटना सुरू आहेत. आजपर्यंत सुमारे १५० पेक्षा अधिक जणांनी प्राण गमावले आहेत. गावे जळून खाक झाल्याने बेघर झालेल्या ५० हजार लोकांना सरकारी सहाय्यता शिबिरात रहावे लागत आहे. जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता कमी होत चालली आहे, शाळा कॉलेजेस सुरू होत नाहीत. इंटरनेट सेवा बंद केल्या गेल्याने तेथील परिस्थितीचा अंदाज घेणे कठीण होऊन बसले आहे.

स्थानिक जनतेचा तेथील स्थानिक पोलीस व अर्धसैनिक यांच्याऐवजी सुरक्षेच्या बाबतीत स्वतःच्या सशस्त्र गटांवर अधिक विश्वास आहे. सुरक्षा व अन्य काही कारणांनी राज्य व केंद्र सरकारच्या पोलीस दलांमध्ये वाद होत आहेत. विरोधी पक्षांनी शांतता प्रस्थापित करण्यासाठी राज्यातील बिरेन सिंह सरकार बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणी केली आहे. अजूनही परिस्थिती निवळत नाही याचा अंदाज घेत आपसातील मतभेद बाजूस सारून राजकीय पक्षांनी एकत्रितपणे शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केल्यास मणिपूरमधील सामान्यांचे जीवनमान पूर्ववत होऊ शकते. केंद्र सरकारने मणिपूरमधील हिंसाचार, जाळपोळीच्या घटना थांबविण्यात येत असणाऱ्या पेचप्रसंगांवर आपल्या अखत्यारीतील उपाययोजना तातडीने आखाव्यात जेणेकरून तेथील विस्कळीत झालेले जनजीवन पूर्वपदावर येईल.

- राजन पांजरी, जोगेश्वरी.

पुण्यात गुन्हेगारी फोफावत चालली आहे

प्रेम प्रकरणातून दर्शना पवार या एमपीएससी उत्तीर्ण तरुणीची हत्या झाल्याचा प्रकार ताजा असतानाच पुण्यात आणखी एक धक्कादायक घटना घडली आहे. शहरातील सदाशिव पेठ भागात भरदिवसा एका तरुणीवर कोयत्याने वार करण्यात आला. या मूळ पुन्हा एकदा महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सरकारने अशा कृत्य करणाऱ्या गुन्हेगारास कठोर शिक्षा द्यावी तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी महिला पोलीस बीट मार्शलची संख्या वाढविण्यात यावी. या दलातर्फे महिलांसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची व कायद्याची इत्यंभूत माहिती द्यावी. होणाऱ्या अत्याचारावर प्रतिबंध घालण्यासाठी जनजागृती करण्यात करावी. जेणेकरून महिलांवर होत असलेले प्राणघातक घटनांना आळा बसेल. खरंच आजची स्त्री कितपत सुरक्षित आहे, हा प्रश्न आ वासून उभा आहे.

- अश्विनी गोरे, सोलापूर.

कृषी दिवस

आज हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा जन्मदिन. त्यांच्या जन्मदिनानिमित्त आजचा दिवस म्हणजे १ जुलै हा दिवस संपूर्ण राज्यात 'कृषी दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यांच्यामुळेच देशात हरितक्रांती होऊ शकली.



वसंतरावांच्या याच योगदानाची आठवण म्हणून महाराष्ट्र सरकारने १ जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. राज्यभर हा दिवस वेगवेगळ्या उपक्रमांनी साजरा केला जातो. शेती ही फार पुरातन काळापासून चालत आली आहे. शेती हाच आपला मुख्य व्यवसाय आहे. देशातील सत्तर टक्के लोक शेतीच करतात. राज्यात शिवाजी महाराजांच्या काळात शेतकऱ्याला खूप महत्वाचे स्थान होते. दिवाळीच्या सणाला प्रत्येक घरात शेतकऱ्यांसाठी प्रार्थना केली जायची. ईडा पीडा टळो आणि बळीचे राज्य येवो असा आवाज घरोघरांतून ऐकू यायचा. हा आवाज आता कुठे तरी लुप्त होऊ लागला आहे. अनेक सामस्यांनी ग्रासलेल्या शेती आणि शेतकऱ्यांसाठीचा हा आवाज पुन्हा कसा घुमेल यासाठी आजच्या कृषिदिनापासूनच प्रयत्न करायला हवेत. आज शेतीची आणि शेतकऱ्यांची अवस्था दयनीय आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांनी बळीराजा पिचला आहे. 'शेतकरी' हा शब्द बोलायला जेवढा सोप्पा आहे तेवढा सोप्पा नाही. शेती करताना अचानक येणाऱ्या संकटांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. त्यात बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, गारपीट, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकाराकडून किंवा बँक, पतसंस्था इत्यादींकडून घेतलेले कर्ज परतफेडीची मुदत, निर्यातीत होणारे शासकीय बदल या व अशा सर्व संकटाला शेतकरी सामोरे जात असतो. हवामानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शेतीतील पिकांचे नुकसान होते. हजारो-लाखो रुपये खर्च करून शेतकरी आपला शेतीमाल तयार करतो. त्याची काळजी घेतो. पण त्याला त्याच्या कष्टाचे फळ मिळतेच असे नाही. कधी आस्मानी तर कधी सुलतानी संकटांनी बळीराजाचा हातचा घास हिरावला जातो. शासन दरबारीही त्याची दखल घेतली जात नाही. कर्जाच्या बोझ्याखाली अडकून बळीराजा आत्महत्या करतो. महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांना कोणी वाली नाही अशी भावना शेतकऱ्यांची झाली आहे. हे चित्र बदलायला हवे. पुन्हा एकदा 'इडा पीडा टळो, बळीचे राज्य येवा' हा आवाज घरोघरातून घुमायला हवा यासाठी आजच्या कृषिदिनापासून प्रयत्न करायला हवेत. आजच्या कृषी दिवसाच्या निमित्ताने तमाम शेतकरी बांधवांना कृषिदिनाच्या शुभेच्छा!

- श्याम ठाणेदार, दौंड.

मणिपूरमधील चिंता

गेल्या दीड महिन्यापासून धुमसत असलेल्या मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न होत असले, तरी अद्याप त्याला यश येताना दिसत नाही. उलट तेथील हिंसाचाराचे स्वरूप बदलत असून, दंगलखोरांवर कारवाई करणाऱ्या लष्करी जवानांना रोखले जात आहे. या घडामोडी चिंताजनक असून, परिस्थिती चिघळू नये यासाठी काळजीपूर्वक पावले उचलायला हवीत.

मणिपूरच्या मैदानी प्रदेशावरील मैतेई आणि डोंगराळ भागातील कुकी या दोन जमातींमधील हिंसाचार थांबविण्यात राज्य सरकारला मोठे अपयश आले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या दौऱ्यानंतरही हिंसाचार न थांबता वाढत गेला. त्यामुळे गेल्या आठवड्यात शहा यांनी मणिपूरबाबत सर्वपक्षीय बैठक घेतली.

राज्य सरकारच्या अपयशाकडे; तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मणिपूरमध्ये लक्ष न घातल्याकडे विरोधकांनी लक्ष वेधले आणि मुख्यमंत्री बीरेनसिंह यांच्या राजीनाम्याची त्यांनी मागणी केली. हे राजकारणाला साजेसे झाले. मणिपूरबाबत केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेऊन शहा यांनी पुढील दिशाही स्पष्ट केली. तूर्तास बीरेनसिंह यांना जीवदान मिळाल्याचे चित्र आहे. हिंसाचार रोखण्यासाठी सर्व समाजघटकांनी एकत्र येऊन चर्चा करावी, असे सिंह यांनी म्हटले आहे. यासाठी त्यांनाच पुढाकार घ्यावा लागेल आणि मुख्य म्हणजे सर्व घटकांत विश्वास निर्माण करावा लागेल. ते स्वत: मैतेई समाजाचे असल्याने त्या समाजाची बाजू घेतात, असा आरोप होतो. तो त्यांना कृतीने खोडून काढावा लागेल. आतापर्यंत हिंसाचारात १३१ लोक मृत्यमुखी पडले असून, साठ हजारांहून अधिक विस्थापित झाले आहेत. पोलिस ठाणी आणि शस्त्रागार लुटून तेथील शस्त्रास्त्रे पळवून दंगलखोरांनी हिंसाचार केला आहे; त्यासाठी त्या-त्या जमातींच्या पोलिसांनी अप्रत्यक्ष मदत केल्याच्या घटना आहेत.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

पड रं पाण्या, पड रं पाण्या... कर पाणी पाणी..! केविलवाण्या बळीराजाची आळवणी

तीन नक्षत्र कोरडी; जिल्ह्यातील ८२ मंडळात सोसाट्याचा वारा

सुराज्य/सोलापूर

दिवसभर सोसायट्याचा वारा... अन् नुसताच धुरळा... जून संपला तरी पावसाचा टिपूसही नाही. 'सर्वत्र पेरण्या खोळंबल्या असून, काळजीने व्याकूळ झालेला बळीराजाच्या तोंडी आता गायक प्रल्हाद शिंदे यांचे पड रं पाण्या, पड रं पाण्या, कर पाणी पाणी! शेत माझं लंय तान्हीलं, चातकावणी...' या गीतातील ओवीप्रमाणे बळीराजासह सर्वसामान्य नागरिक पावसासाठी आळवणा करीत आहे.

रोहिणी मृग नक्षत्र गेले कोरडे गेल्याने आद्रा तरी आधार देईल अशी अपेक्षा असताना जिल्ह्यातील ९१ मंडळापैकी केवळ ९ मंडळात बऱ्यापैकी पाऊस पडला असून ८२ मंडळात केवळ सोसाट्याचा वारा सुटल्याने धास्तावलेला बळीराजा मेघराजाच्या प्रतिक्षेत आहे. जिल्ह्यातील ९१ मंडळापैकी केवळ ९ मंडळात सरासरी पेक्षा कमी मात्र ५० मी मी पेक्षा जास्त पाऊस पडला आहे. उर्वरित जवळपास ८२ मंडळात फारच कमी म्हणजे कुठे २-३ मी मी तर कुठे १५-२० मी मी पाऊस पडला आहे.या आठवड्यात दमदार पाऊस पडला तरच पेरणी होवू शकते अन्यथा खरीप हंगाम धोक्यात असल्याचे मत शेतकऱ्यांतून व्यक्त केले आहे.

मृग नक्षेत्रामध्ये पेरणी झाली तर उत्पादनामध्ये वाढ होते. मात्र, या नक्षत्रामध्ये पेरणी न झाल्यास उत्पादनात घट ही त्याच प्रमाणामध्ये येते. मृग नक्षत्रामध्ये जर पेरणी झाली तर उत्पादन शंभर टक्के मिळते, जर मृग नक्षत्र टाळून पुढे गेले तर उत्पादनामध्ये १५ ते २० टक्के घट येते. त्यामध्ये शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनावर परिणाम होतो. असे जिल्ह्यातील अनेक जानकार शेतकऱ्यांनी सांगितले.

एकूण २७ नक्षत्र.

एकूण २७ नक्षत्र असून यामध्ये काही महत्त्वाची नक्षत्र आहेत. त्या नक्षत्रामुळे ऋतूवर व कालचक्रावर मोठ्या प्रमाणात त्याचा परिणाम होतो. अश्विन, भरणी, कृत्तिका, रोहिणी, मृगशिरा, आद्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा मघा, पूर्वा फाल्गुनी, उत्तर फालगुनी, हस्त, चित्रा, स्वाती,विशाखा, अनुराधा, ज्येष्ठ, मूला, पूर्वा वाढ, उत्तरावाढ, श्रावण, धनिष्ठा, पूर्व भाद्र, उत्तरभाद्र, रेवती ही नक्षत्र महत्त्वाची मानले जातात.

पावसाचा अंदाज फेल.

जून महिन्यात जिल्ह्यात सरासरी ९९.१ मी.मी पाऊस पडणे अपेक्षित असताना २९ जून पर्यंत केवळ २८.४ मीमी पाऊस पडला आहे. यामध्ये मंगळवेढा ५६ मी मी.उत्तम सोलापूर ४० मीमी दक्षिण सोलापूर ३९ मी मी.माळसिरस ३६ मी मी.इतक्या पाऊसाची नोंद आहे तर इतर तालुक्यात फारच कमी नोंद आहे.

आद्रा नक्षत्राचा पहिला आठवडा कोरडा गेल्यानंतर २३ ते २९ जून दरम्यान पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता.२५ जून रोजी जिल्ह्यात कमी- जास्त प्रमाणात पाऊस पडला परंतु चांगल्या पाऊसाचा अंदाज फेल गेला.

मागील वर्षी याच कालावधीत जिल्ह्यात एकूण ८१ मी मी पाऊस पडला होता.राज्यात अद्याप पुरेसा व पेरणीयोग्य पाऊस झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाने शेतकऱ्यांना केले आहे. हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार या आठवड्यात पावसाची शक्यता असून त्यानंतरच पेरण्यांना वेग येऊ शकणार आहे.



साहित्यिकांच्या संवेदनशील निर्मितीमुळे समाजात आस्था : डॉ. कोकाटे

राजर्षी शाहू साहित्य पुरस्कारांचे वितरण

सुराज्य/बार्शी

साहित्यिकांच्या संवेदनशील निर्मितीमुळे समाजात जनसामान्यांबद्दल कमालीची आस्था निर्माण होत आहे, असे प्रतिपादन इतिहास संशोधक डॉ. श्रीमंत कोकाटे यांनी केले. पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते.

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा बार्शीच्या वतीने इतिहास संशोधक डॉ. श्रीमंत कोकाटे व आधुनिक बहिणाबाई म्हणून प्रसिध्द कवयित्री विमल माळी यांना प्राचार्य व न इंगळे पुरस्कृत राजर्षी शाहू महाराज साहित्य पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. ज्येष्ठ संपादक राजा माने, कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बी वाय यादव यांचे हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, गुच्छ देऊन मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना डॉ. श्रीमंत कोकाटे यांनी म सा प शाखा बार्शीच्या उल्लेखनीय कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. शाहू महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांच्या अनमोल कार्याचा सविस्तर आढावा घेतला. एका प्रसंगाचे भावपूर्ण शैलीत वर्णन करताना ते म्हणाले, शाहू महाराजांच्या प्रति आदर व्यक्त करताना जनतेने त्यांच्या रथाला माणसांनी ओढण्याची तयारी केलेली पाहून महाराज म्हणाले मी जनावरांची माणसे करायला आलोय, माणसांची जनावर करायला आलो नाही! अशाप्रकारे शाहू महाराजांची तळमळ, कामाचा व्यासंग व शाहू महाराजांच्या अष्टपैलू कार्यकर्तृत्वाचे उदाहरण दाखल्यांसह यथोचित वर्णन केले.

कवयित्री विमल माळी यांनी आपल्या कवितांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. प्रारंभी प्रास्ताविकातून मसापचे अध्यक्ष पां न निपाणीकर यांनी शाखेच्या विविधांगी कार्याची सविस्तर माहिती दिली. शाहू पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ. राजेंद्र दास यांनी शाहू महाराजांच्या नावे दिला जाणारा पुरस्कार साहित्यिकांमध्ये समाजभान निर्माण करण्यास प्रेरणा देत असल्याचे सांगितले. डॉ. बी वाय यादव, जेष्ठ संपादक राजा माने, जयकुमार शितोळे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी बार्शीतील साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी म सा प बार्शीचे प्रा. डॉ. रविराज फुरडे, बाबासाहेब कथले, प्रकाश गव्हाणे, प्रमिला देशमुख, आबासाहेब घावटे, दिलीप कल्याणी, प्रकाश महामुनी, प्रदीप गव्हाणे, गिरीश सोनार, शारदा पानगावकर, सुवर्णा शिवपुरे, शिल्पा मठपती, सुमन चंद्रशेखर, प्रदीप कांदे, कल्याण घळके, आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. किरण गाढवे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. बी आर देशमुख यांनी केले. म सा प चे माजी कार्यवाह दिवंगत शब्बीर मुलांनी यांना यावेळी श्रद्धांजली वाहण्यात आली.

नातेपुतेच्या एस.एन.डी. इंटरनॅशनल सीबीएससी स्कूलमध्ये दिंडी

नातेपुते : वारकऱ्यांच्या वेशभूषेतील लहान मुले, पालखी मिरवणूक, टाळ मृदुंग आणि विठू नामाचा गजर, अशा विठ्ठलमय वातावरणात आज या चिमुकल्यांची शाळा भरली. नामदेव महाराज म्हणतात, माझे कुळींचे दैवत बाप माझा पंढरीनाथ पंढरीस जाऊ चला भेटू रखूमाई विठ्ठला असे काहीसे म्हणत ही चिमुकली मंडळी विठूरायाच्या जयघोषात तल्लीन झाली. नातेपुते येथील एस एन डी इंटरनॅशनल सीबीएससी स्कूलमध्ये आषाढी वारीनिम्मित खास चिमुकल्यांची दिंडी काढून पालखी काढण्यात आली.यावेळी एस एन डी इंटरनॅशनल स्कूलचे मार्गदर्शक व संस्थापक अध्यक्ष बाबाराजे देशमुख सुचित्रादेवी देशमुख, संचालिका श्रुतिका देशमुख यांच्या हस्ते पूजन व आरती घेण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांच्या पालखी सोहळ्यास एस एन डी इंटरनॅशनल स्कूलचे मार्गदर्शक व संस्थापक अध्यक्ष बाबाराजे देशमुख, सुचित्रादेवी देशमुख, संचालिका श्रुतिका देशमुख, ॲड शिवाजीराव पिसाळ उपस्थित होते.

साताऱ्याच्या मातंग परिषदेला उपस्थित राहण्याचे आवाहन

वेळापूर : राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने पश्चिम महाराष्ट्रातील मातंग समाजातील विविध सामाजिक संघटनेतील व राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांची मातंग समाजातील विविध प्रलंबित विषयावर विचार विनिमय करण्यासाठी राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत ३ जुलै २०२३ रोजी मातंग परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेस सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष माजी आमदार जयदेव गायकवाड व उपाध्यक्ष पंडित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती खासदार श्रीनिवास पाटील, सभापती रामराजे निंबाळकर, माजी मंत्री संजय बनसोडे, माजी आमदार शशिकांत शिंदे, आमदार मकरंद पाटील, माजी मंत्री बाळासाहेब पाटील, समन्वयक बसवराज पाटील, आमदार दीपक चव्हाण, सातारा जिल्हाध्यक्ष सुनील माने, सरचिटणीस राजकुमार पाटील आदी प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदर परिषदेसाठी सोलापूर जिल्ह्यातून जास्तीत जास्त मातंग समाजातील विविध सामाजिक संघटनेतील प्रमुख पदाधिकारी व राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे तालुका व जिल्हा पदाधिकाऱ्यासह कार्यकर्ते यांनी आनंदराज मल्टीपर्पज हॉल कोंडवे, राजदीप नगर बेंगलोर हायवे सातारा येथे दुपारी १२ वाजेपर्यंत उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ.धनंजय साठे यांनी केले आहे.

प्रामाणिक डॉक्टरांची समाजाने दखल घेतली पाहिजे : डॉ. परळे

सुराज्य/सोलापूर

डॉक्टरांचे मानवी जीवनात अनन्य साधारण महत्त्व आहे. जीव वाचवणं, आयुष्यमान वाढवणं, रुग्णाला रोगमुक्त करणं, समाजाचे प्रबोधन करणं हे डॉक्टरांचे काम आहेच. त्यामुळे प्रामाणिक, मेहनती व व्यावसायिक मुल्ये जपणाऱ्या डॉक्टरांची समाजाने दखल घेतली पाहिजे आणि डॉक्टरांनीसुध्दा पैशा पेक्षा रुग्णसेवेला अधिक महत्त्व द्यावे असे आवाहन सुप्रसिध्द हृदयरोग तज्ञ डॉ. गुरुनाथ परळे यांनी केले.

ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, इंडियन रेड क्रॉस सोसायटी सोलापूर शाखा, श्रीमती गोपाबाई दमाणी रक्त केंद्र व अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र सोलापूर यांच्या सहकार्याने डॉक्टर्स डे च्या पूर्वसंध्येला अश्विनी सहकारी रुग्णालयाच्या सेमिनार हॉलमध्ये सहा डॉक्टरांच्या सत्कार प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अश्विनी रुग्णालयाचे ज्येष्ठ संचालक डॉ. विजय पाटील हे होते. यावेळी मंचावर फॅमिली प्लॅनिंगचे अध्यक्ष प्राचार्य के. एम. जमादार मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे मानद सचिव जयेश पटेल, सहसचिव खुशाल देडिया, अश्विनी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.राजेंद्र घुली आदी उपस्थित होते.

प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. याप्रसंगी स्त्रीरोग व प्रसूती शास्त्रज्ञ डॉ. माधुरी दबडे, सुप्रसिध्द फिजिशियन डॉ. सिध्देश्वर रुद्राक्षी, सुप्रसिध्द अस्थिरोग तज्ञ डॉ. व्यंकटेश मेतन, सुप्रसिध्द कॅन्सर सर्जन डॉ. फहीम गोलीवाले, सुप्रसिध्द फिजिशियन डॉ. हर्षवर्धन जोशी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सोनिया बागडे या डॉक्टरांचा डॉ. गुरुनाथ परळे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. माधुरी दबडे, डॉ. फहीम गोलीवाले, डॉ. व्यंकटेश मेतन व डॉ. सोनिया बागडे यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी करून दिला. शेवटी जयेश पटेल यांनी आभार मानले. यावेळी अशोक लांबतुरे, विलास पाटील, यशोदा डागा उपस्थित होती.

दूध दर निश्चितीसाठी ११ सदस्यांची समिती नियुक्त

दर तीन महिन्यांनी जाहीर होणार दुधाचा खरेदी दर

सुराज्य/सोलापूर

ऐन पुष्टकाळात दूध प्रकल्पांनी दुधाचे खरेदी दर कमी केल्याने दूध उत्पादकामध्ये असंतोष पसरला आहे. या संदर्भात शेतकऱ्यांनी वेळोवेळी आवाज उठवला. त्याची दखल राज्य सरकारने गांभीर्याने घेतली असून, यासंदर्भात दूध दर निश्चित करण्यासाठी ११ सदस्यांची समिती गठित करण्यात आली आहे. या समितीमध्ये सरकारी प्रतिनिधींसह खाजगी व सहकारी दूध प्रकल्पातील प्रतिनिधींचा समावेश असून, दूध उत्पादकांचे प्रतिनिधी देखील घेण्यात आले आहेत. ही कमिटी दर तीन महिन्यांनी वर्तमान स्थिती लक्षात घेऊन दुधाचे खरेदी दर निश्चित करणार आहे.

राज्यातील दूध दर प्रश्नाबाबात पशुसंवर्धन मंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनुसार ही समिती गठित करण्यात आली आहे. कृश काळामध्ये दूध उत्पादन कमी असते. त्या काळात दुधाच्या उत्पादकांना दुधासाठी रास्त दर मिळतो, परंतु पुष्टकाळात दुधाचे उत्पादन वाढल्याने दुधाचे दर कमी होतात आणि खाजगी व सहकारी दूध संघाकडून शेतकऱ्यांचे दूध कमी प्रमाणात स्वीकारले जाते. यंदा हे दर मोठ्या प्रमाणावर घसरण झाल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाल्यामुळे ही बैठक घेण्यात आली होती.

राज्यातील दूध संकलन हे खाजगी आणि सहकारी दूध संघाकडून केले जात आहे. दुधाच्या कृष काळात दूध उत्पादन कमी असल्याने दुधाच्या भावात वाढ होते परंतु ज्यावेळी दुधाचे उत्पादन वाढते त्या काळात मात्र खाजगी व सहकारी दूध संघाकडून शेतकऱ्यांचे दूध कमी दराने स्वीकारले जाते. त्यामुळे दूध उत्पादन शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागतो, या बाबी लक्षात घेत सहकारी व खाजगी दूध संघाचा चालवण्याचा खर्च आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च विचारात घेऊन शेतकऱ्यांच्या दुधाला किमान दूध भाव मिळण्यासाठी व दुधाचे दर निश्चित करण्यासाठी ही समिती गठीत करण्यात आली आहे

ही समिती दर तीन महिन्यांनी बैठक घेवून राज्यातील सहकारी व खाजगी दूध संघाकडून जे दूध संकलित होत आहे, त्या दुधाच्या उत्पादक शेतकऱ्यांच्या गाईंना दुधाला ३.५/८.५ या प्रतीस व म्हशीच्या ६.०/९.० या प्रतीच्या दुधास दिला जाणारा किमान दूध दर निश्चित करतील.

या दुधाला दूध व्यवसाय विकास विभागाचे आयुक्त शासनाची मान्यता घेतील आणि हा दूधदर कोणतीही कपात न करता दूध उत्पादकांना देणे हे राज्यातील सहकारी व खाजगी दूध संघांना बंधनकारक राहील. अशा प्रकारचा हा आदेश देण्यात आला आहे

अशी असेल समिती

दूध व्यवसाय विकास विभागाचे आयुक्त हे अध्यक्ष तर उपायुक्त हे सचिव असतील. यामध्ये महानंदाचे अध्यक्ष, राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाचा प्रतिनिधी सदस्य असतील. महत्त्वाची गोष्ट अशी की यामध्ये खाजगी दूध संघाच्या प्रतिनिधीमध्ये इंदापुरातील सोनाई दूध संघ, चितळे डेअरी भिलवडी व ऊर्जा मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट या तीन प्रकल्पांचे सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सहकारी दूध संघामध्ये जळगावच्या जिल्हा दूध उत्पादक संघ, वारणा सहकारी दूध संघ, कोल्हापूर जिल्हा दूध संघ, औरंगाबाद जिल्हा दूध संघ यांचा समावेश करण्यात आला आहे.

राष्ट्रवादीच्या रक्तदान शिबिरात शंभर जणांचे रक्तदान

सुराज्य/सोलापूर

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकारी अध्यक्ष संसदरत्न सुप्रियताई सुळे यांच्या वाढदिवसानिमित्त शरद प्रतिभा प्रतिष्ठान सोलापूर शाखेच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात शंभर रक्तदात्यांनी या शिबिरामध्ये रक्तदान केले.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन कुमार करजगी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. मेडिकेअर ब्लड बँकेच्या वतीने रक्त संकलित करण्यात आले. १०० रक्तदात्यांनी रक्तदान केले. उपस्थित मान्यवरांचा प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार करण्यात आले

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष भारत जाधव, माजी महापौर महेश कोठे, काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम बरडे, मनोहर सपाटे, महेश गादेकर, यू. एन. बेरिया, सुधीर खरटमल, शंकर पाटील, नाना काळे, संतोष पवार, विद्या लोलगे, किसन जाधव, तौफिक शेख, बिज्जु प्रधाने, सिकंदर गोलंदाज, लहू गायकवाड, मारुती तोडकर, सुभाष डांगे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रशांत बाबर, सचिव दिपक राजगे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे चंद्रकांत पवार, राम साठे, शंतनु साळुंके, सिध्दार्थ सर्वगोड, अबु बक्कर सय्यद, प्रमोद भोसले, सिध्दलिंग म्हेत्रे, तम्मा पोतदार, निलेश धोत्रे, शशिकांत सोनटक्के, गोटू गायकवाड, राजू भंडारी, नागेश म्हेत्रे, सुनिल माने, प्रियवंदा पवार, नागनाथ मेंगाने, बसू कोळी, गणेश पाटील, बिरप्पा बंडगर, विजय गावडे, ओंकार राजगे, अमित सुरवसे, विपूल केसकर, संदिप गायकवाड, जुबेर शेख, प्रमोद सावंत, बाळू मोरे, माऊली भुतकर, प्रविण कदम आदी उपस्थित होते.

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
पत्ता- इंद्रभुवन, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१.
नगर अभियंता कार्यालय, रस्ते विभाग - email - smcaeroad@gmail.com मो.9403033252

ई-निविदा सूचना क्र ०९/२०२३-२४

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर नगर अभियंता कार्यालय रस्ते विभागाकडून केंद्र शासन पुरस्कृत NCAP योजनेअंतर्गत खालील कामाचे ई-निविदा बाबत.

१.टेंडर आय.डी- 2023_SMC_921269_1

वरील कामाचे निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.०१/०७/२०२३ ते दि.१७/०७/२०२३ पर्यंत भरणेस उपलब्ध आहे.

सही/-
प्र.नगर अभियंता
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

महापालिकेची अतिक्रमण मोहिम सुरूच

जुना कारंबा नाका ते जैन गुरुकुल प्रशाला परिसरात कारवाई

सुराज्य/सोलापूर

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज शुक्रवारी जुना कारंबा नाका , सम्राट चौक ते जैन गुरुकुल प्रशाले दरम्यान परिसरात रस्त्याच्या कडेला अडथळा ठरणारे अतिक्रमण जेसीबीच्या साह्याने जमीनदोस्त करण्यात आले.

सोलापूर शहरात रस्त्याच्या कडेला रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण हटविण्याची मोहीम महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाकडून शुक्रवारीही राबविण्यात आली. जेसीबीच्या साह्याने पोलीस बंदोबस्तात ही धडक मोहीम राबविण्यात आली. शुक्रवारी सकाळपासूनच जुना कारंबा नाका, सम्राट चौक ते जैन गुरुकुल प्रशाला दरम्यानच्या रस्त्याच्या कडेला तसेच फुटपाथवर करण्यात आलेले अतिक्रमण जमीनदोस्त करण्यात आले.

फुटपाथवर अतिक्रमण करून टाकण्यात आलेले पत्रा शेड जेसीबीच्या साह्याने जमीनदोस्त करण्यात आले. त्याचबरोबर चार चाकी एक गाडी आणि तीन खोकेही महापालिका प्रशासनाने जप्त केली आहेत. जैन गुरुकुल प्रशाला परिसर आणि तेथील बँकेच्या लगत असलेल्या बस स्टॉप शेजारी गेल्या अनेक वर्षापासून खोकी आणि चार चाकी गाड्या रस्त्यावर अडथळा ठरेल अशा लावण्यात येत होत्या. अखेर आज महापालिका प्रशासनाकडून त्यांच्या विरोधात कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे या रस्त्याने मोकळा श्वास घेतला. शहरात सर्वत्र अतिक्रमण विरोधात दैनंदिन मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिक व व्यापाऱ्यांनी आपला व्यवसाय नियमानुसार आपल्या जागेतच करावा अन्यथा जप्ती तसेच प्रसंगी फौजदारी कारवाई करण्यात येईल. नागरिक व व्यापाऱ्यांनी महापालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी केले आहे.

प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन

सोलापूर : धाराशिव येथे शुक्रवारी सुरू झालेल्या राज्यातील खो-खो प्रशिक्षकांच्या तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी श्रीकांत कुंटला, भारतीय खो खो महासंघाचे सहसचिव डॉ. चंद्रजित जाधव, अर्जुन पुरस्कार विजेत्या सारिका काळे, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते शाहूराजे खोगरे व रहिमान काझी उपस्थित होते. सचिव प्रविण बागल, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सहसचिव जयांशु पोळ, पवन पाटील व राजेश सोनवणे यांनी केले.

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम लोकांना जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि।। व सब डि।। सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील साखर पेठ येथील खालील वर्णनाचे मिळकत :- (१) सि.स.नं. ९८५५ यांसी म्युनिसिपल घर नं. १४९ याचे एकूण क्षेत्र १२६.२० चौ.मी. इतकी आहे. (२) सि.स.नं. ९८५५ यांसी म्युनिसिपल घर नं. १५०. याचे एकूण क्षेत्र ७५.२० चौ.मी. इतकी आहे. (३) सि.सं.नं. १०४९५ याचे एकूण क्षेत्र ८.४० चौ.मी. इतकी आहे. सदर तिन्ही मिळकत ही एकमेंकास लागून आहे. सदर मिळकतीच्या चारही भिंती स्वतंत्र मालकीच्या आहेत. यांसी एकत्रीत चतुःसिमा :- पुर्वेस- रस्ता, उत्तरैस- रस्ता. पश्चिमेस- सि. सर्व्हे नं. ९८५९. सि. दक्षिणेस सर्व्हे नं. ९८४६, ९८५७ असे आहे. वर नमूद तिन्ही मिळकती ह्या श्री. श्रीहरी अंबाजी इंदापुरे यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. सदर वर नमूद तिन्ही मिळकती आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवले आहे.

वर नमूद तिन्ही मिळकती ह्या निर्बंध व निजोखमी आहे, अशी तिन्ही मिळकती मालकांनी आमचे अशिलांना खात्री व भरवसा दिले आहे. तरी परंतु वरील तिन्ही मिळकतीबाबत कोणाचा गहाण, दान, लिज, टांच, पत्र, साठेखत, खरेदीखत, नोटरी करार-मदार, इसारा पावती, कब्जा साठेखत, पोटगी, कोर्ट केस, बँक कर्ज बोजा, तसेच सहकारी संस्था वगैरे कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाचे आत लेखी कागदपत्राचे पुराव्यानिशी खालील नमुद पत्त्यावर येवून आमचे अशिलाची खात्री करून द्यावी. मुदतीत कुणाचीही तक्रार व हरकत न आल्यास सदर तिन्ही मिळकती ह्या निर्वेध व निजोखमी आहे असे समजून खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मग तद्नंतर सदर वर नमुद तिन्ही मिळकतीबाबत व मालकीबाबत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत व तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी. ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. ता. ३०/६/२०२३.

सही/-
ॲड.आर.डी. शेरला
B.Com LL.B G D C & A LL.M
४अ, यशवंत हौसिंग सोसायटी,
स्वागत नगर रोड, कुमठा नाका, सोलापूर.
मो.नं.९६०४७८३१३०, अशिलातर्फे ॲडव्होकेट

नवनवीन प्रयोगासाठी कृषी प्रदर्शन उपयुक्त ठरेल : मुख्यमंत्री

कृषी पंढरी प्रदर्शन व तृणधान्य महोत्सवाला मुख्यमंत्र्यांची भेट

✔ सुराज्य/पंढरपूर

पारंपरिक शेतीबरोबर नवनवीन, अत्याधुनिक शेतीतून उत्पादन घेतल्यास बळीराजा समृद्ध होईल. शेतकऱ्यांनी त्याच मेहनतीत दुप्पट उत्पादन देणाऱ्या प्रजातीची लागवड करावी. अशा नवनवीन प्रयोगांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी हे प्रदर्शन उपयुक्त ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज व्यक्त केला.

कृषि विभागाच्यावतीने आयोजित कृषि पंढरी प्रदर्शन व तृणधान्य महोत्सव २०२३ कार्यक्रमात ते बोलत होते. पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समिती आवारात आयोजित या कार्यक्रमास वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीष महाजन, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार भरत गोगावले, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने, आत्माचे प्रकल्प संचालक मदन मुकणे आदी उपस्थित होते.

शासकीय महापुजेवेळी आपण विठुरायाला बळीराजाच्या समृद्धीसाठी साकडे घातले असल्याचे सांगून श्री. शिंदे म्हणाले, शासनाने बळीराजाच्या हिताचे अनेक निर्णय घेतले आहेत. शेती आणि शेतकऱ्यांसाठी जलयुक्त शिवार २.०, नमो शेतकरी महासन्मान निधी योजना, केवळ १ रुपयांत पीकविमा, उत्पन्नवाढीसाठी महाकृषिविकास अभियान आदी योजना सुरू केल्या आहेत. एक रुपयात पीक विमा देण्यासाठी विमा हप्त्याची रक्कम शासन भरणार आहे. पीएम किसान योजनेच्या लाभार्थी शेतकऱ्यांना केंद्राप्रमाणे प्रति वर्षी सहा हजार रूपये देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेण्यात आला आहे. याचा

फायदा शेतकऱ्यांना मिळणार आहे, असे ते म्हणाले.

शेतकरी सुखी संपन्न व्हावा, त्याचे आरोग्य चांगले राहावे, अशी सदिच्छा व्यक्त करून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, हे आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष आहे. यानिमित्ताने प्रदर्शनात तृणधान्य व त्याचे उप पदार्थ पाहावयास मिळाले. हे प्रदर्शन शेतकऱ्यांना समृद्ध करणारे ठरेल. त्यातून माहिती आणि प्रेरणा घेत शेतकऱ्यांनी प्रयोग केल्यास नवीन कृषि क्रांती होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रास्ताविक दत्तात्रय गावसाने यांनी केले. आभार मदन मुकणे यांनी मानले.

प्रारंभी मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते कृषि पंढरी प्रदर्शन व तृणधान्य महोत्सव २०२३ चे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांनी प्रदर्शनातील विविध दालनांना भेट देवून पाहणी केली. तसेच आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य वर्षानिमित्त उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉईंट वरती छायाचित्रे घेतली. यावेळी कृषी विषयक विविध माहिती पत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले.

कृषी पंढरी प्रदर्शन व तृणधान्य महोत्सव २०२३

कृषिविषयक आधुनिक विकसित तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे, शासकीय योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे, शेतकरी – शास्त्र विस्तार यंत्रणा साखळी सक्षमीकरण करणे, शेतकरी उत्पादक ते ग्राहक थेट विक्री श्रृंखला विकसित करणे, बाजाराभिमुख कृषि उत्पादनास व विपणनास चालना देणे, आहारातील तृणधान्याचे महत्व पटवुन देणे हा या महोत्सवाच्या आयोजनाचा हेतू आहे. या प्रदर्शनात एकूण १२५ स्टॉल्स उभारण्यात आले असून, शासकीय विभागाचे स्टॉल २९ आहेत. महामंडळ, शेतकरी उत्पादक कंपनी, मिलेट उत्पादने, प्रक्रियायुक्त पदार्थ, सेंद्रीय व औषधी पदार्थ, बियाणे खते औषधे कंपनी, ठिबक व तुषार सिंचन उत्पादक, कृषि यांत्रिकीकरण आणि गृहोपयोगी वस्तुचे स्टॉल्स आहेत.

सहकार महर्षि अभियांत्रिकीमध्ये विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

✔ **अकलूज** : अकलूज येथील सहकार महर्षि शंकरराव मोहिते - पाटील इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च , शंकरनगर अकलूज या अभियांत्रिकी महाविद्यालयामधील अंतिम वर्ष पदवी कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरींग विभागाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ दि . २७ रोजी हॉटेल चेहिता रिसॉर्ट, संग्रामनगर, अकलूज येथे संपन्न झाला. निरोप समारंभास प्रमुख अतिथी म्हणून शंकरराव मोहिते महाविद्यालय, माळेवाडी , अकलूजचे माजी प्राचार्य डॉ . आबासाहेब देशमुख हे लाभले . कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रविण ढवळे, कार्यालयीन अधिक्षक शब्बीर शेख, उपस्थित होते. कॉम्प्युटर पदवी अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख प्रा. सचिन पांढरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अमसिध्द बिराजदार यांनी तर आभार प्रदर्शन कु . श्रावणी बाबर हिने केले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संगणक अभियांत्रिकी विद्यार्थी संघटनेची अध्यक्षा कु . दिया रणवरे व सर्व सदस्य यांनी विशेष परीश्रम घेतले.

बसमध्ये प्रवेश करताना महिलेच्या हातातील सोन्याची बांगडी लंपास

✔ **सोलापूर** : बस मध्ये प्रवेश करताना गर्दीच्या फायदा घेऊन चोरट्याने महिलेच्या हातातील ७० हजाराची सोन्याची पाटली शिताफीने पळविली . ही चोरी मोहोळ बस स्थानकात काल बुधवारी दुपारच्या सुमारास घडली .यासंदर्भात मीरा सिध्देश्वर तागडे (वय ५३ रा .नरखेड ता.मोहोळ) यांनी मोहोळ पोलिसात फिर्याद दाखल केली . त्या आपल्या पतीसोबत सोलापुराला जाऊन मोहोळ येथ परतल्या होत्या. त्यानंतर नरखेड येथे जाण्यासाठी त्या मोहोळ बस स्थानकातून वैरागकडे जाणाऱ्या बस मध्ये प्रवेश करीत होत्या. त्यावेळी गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने त्यांच्या उजव्या हातातील वीस ग्रॅम सोन्याची पाटली शिताफिने पळवली. काही अंतर पूढे गेल्यानंतर त्यांना पाटली गायब झाल्याचे दिसून आले. त्यानंतर त्यांनी मोहोळ पोलिसात . फिर्याद दाखल केली आहे.

मोटारसायकलपासून बहुउद्देशीय शेतीयंत्राची निर्मिती

✔ **सोलापूर** : ए.जी पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी दुचाकी वाहनाच्या साह्याने नांगरणी, कोळपणी, फवारणी, ट्रॉली अतिशय कमी खर्चात असे कृषी बहुउद्देशीय वाहन आठ महिन्यात परिश्रम व शेतकऱ्यांना होणारा त्रास व खर्च याचा अभ्यास करून, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्यक एस.के. मडडे यांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी अविनाश भरमगोंडे, राकेश कोरे, आकाश गावडे, युवराज महामुनी,आशिष बोराडे यशस्वीरित्या हे वाहन सादर केले आहे. कोणत्याही दुचाकीला सहजपणे जोडता येईल, अत्यंत कमी खर्चात कोळपणी, पेरणी करता येईल, पंप जोडल्यास औषधे, खते सहज फवारता येतील, शेतात हलकी मालवाहतूक करता येईल, जोडण्या काढून इतर वेळेत मोटारसायकल म्हणून वापरता येईल, या प्रकल्पासाठी संस्थेचे अध्यक्ष ए. जी. पाटील, संस्थेचे सचिव मा. एस.ए.पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम.ए. चौगुले, मेकॅनिकल विभागप्रमुख डॉ.एस.बी.गदवाल,पॉलिटेक्निकचे उपप्राचार्य एस.के.मोहिते यांचे मार्गदर्शन मिळाले.

जनावरांची कत्तल ; आठ जणांवर गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : संगणमत करत सहा गोवंशी जनावरे यांची कत्तल करून आगळीक केली व तसेच त्यांचे मास अवैद्यपणे कब्जात बाळगल्याप्रकरणी आठ जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २९ जून रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास राहुल गांधी झोपडपट्टी येथे घडली.याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल कलप्पा चनबसप्पा देकाणे (नेमणूक जेलरोड पोलीस ठाणे) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून बाबर रिजवान पटेल (वय-२८,रा.राहुल गांधी झोपडपट्टी) यांच्यासह इतर सहा ते सात इस्मानविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

खुलूस व झांबळ पुस्तकाचे आज प्रकाशन

मसाप जुळे सोलापूर शाखेचा उपक्रम

✔ सुराज्य/सोलापूर

येथील महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखेच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक समीर गायकवाड यांनी लिहिलेल्या झांबळ आणि खुलूस या दोन्हीही पुस्तकाचे प्रकाशन शनिवार दिनांक १ जुलै २०२३ रोजी होणार असल्याची माहिती मसाप जुळे सोलापूर शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी दिली.

श्री.हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृह (ॲम्फि थिएटर) येथे सायंकाळी सहा वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाला होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई येथील कुलगुरू तथा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ.रजनीश कामत यांच्या हस्ते. झांबळ आणि खुलूस या दोन्हीही पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. या कार्यक्रमाला निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील सहायक कुलसचिव तथा मराठी भाषा दक्षता अधिकारी डॉ. शिवाजी शिंदे आणि मसाप जुळे सोलापूर

शाखेच्या कार्याध्यक्षा सायली जोशी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असणार आहे.

समीर गायकवाड यांचे खुलूस हे पुस्तक देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांच्या रियल लाईफ स्टोरीजचं आहे. या स्त्रियांचा संघर्ष आणि त्यांच्या शोषणाच्या हृदयद्रावक कथा यात आहेत. तर झांबळ या कथासंग्रहातील कथा ग्रामीण पार्श्वभूमीच्या असून डिजिटल काळाच्या ओघात खेड्यांनी काय गमावलं याचा तो आरसा आहे. सोलापूरसह राज्यातील अन्य भागातील काही ग्रामीण भागातल्या व्यक्तिरेखांचा आणि घटनांचा आधार या कथांना आहे. पुस्तक प्रकाशनाच्या या कार्यक्रमाला साहित्य रसिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखेच्या वतीने अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी केले आहे.

सिद्धेश्वर महास्वामीजींच्या स्मृतीनिमित्त उद्या वृक्षारोपण

✔ सुराज्य/ दक्षिण सोलापूर

ज्ञानयोगी प.पू.श्री सिध्देश्वर महास्वामीजींच्या सहाव्या मासिक स्मृतीचे औचित्य साधून रविवार दि.२जुलै रोजी तेरामैल येथे १८१ वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

साधना-कुटी सत्संग मंडळ,भंडारकवठे, अखिल भाविक वारकरी मंडळ, शाखा द.सोलापूर, अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला, शाखा सोलापूर यांच्या वतीने श्री कृष्णा पॅलेस डॉ.चौधरी हॉस्पिटल बसवनगर (तेरामैल) येथे हा कार्यक्रम सकाळी ९वाजता होणार आहे. शोभाश्री पतसंस्था समूह दक्षिण सोलापूर यांचेही सहकार्य लाभणार आहे. सुधाकर महाराज इंगळे, राष्टीय अध्यक्ष अ.भा.वारकरी मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली ह.भ.प.श्री.

संजय पाटील महाराज सोलापूर प.पू.सिध्देश्वर स्वामीजींचे शिष्य श्री बाबुराव महाराज व्हनवाड, प.पू.श्री. भरतमुनी महाराज, बसवनगर यांच्या प्रमुख उपस्थितीत सीना-भीमा खोऱ्यातील कुसूर, खानापूर, तेलगाव, वडापूर, विंचूर, बाळगी, सादेपूर, माळकवठे, मंद्रूप, बसवनगर, कंदलगाव, गावडेवाडी, मनगोळी या गावातील सर्व प्रमुख मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

चंडक बालक मंदिराच्या दिंडीत रमले बालगोपाल

✔ सुराज्य/सोलापूर

श्री सरस्वती मंदिर संस्था संचलित जडावबाई रामसुख चंडक बालक मंदिर मध्ये आषाढी एकादशी औचित्य साधत दिंडी काढण्यात आली. यावेळी शाळेतील बालक विठ्ठल भक्ती चांगली रमली होती.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष अँड रघुनाथ दामले व सचिवा प्रीती चिलजवार, सदस्य पांडुरंग देशमुख, रेवती कुलकर्णी शाळेच्या मुख्याध्यापिका सोनाली सोनाळे, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. दामले यांच्या हास्ते विठ्ठल-रुक्मिणीची पूजा करून आरती करण्यात आली करण्यात आली. शाळेतील छोटे बाल चिमू वेगवेगळ्या वेषांमध्ये दिंडीमध्ये सहभागी झाले होते. विठ्ठल, रुक्मिणी, ज्ञानेश्वर, मुक्ताई, संत तुकाराम, निवृत्ती, सोपान असे वेगवेगळ्या वेशभूषेमध्ये विद्यार्थ्यां सहभागी झाले होते. शाळेपासून निघालेली दिंडी शुभराय मठा मध्ये दिंडी नेण्यात आली मुलांनी टाळ मृदुंगाच्या तालावर विठ्ठलाची गाणी गायली तर मुलींनी फुगड्या खेळून आनंद व्यक्त केला जसे साक्षात पंढरपुर अवतरले असे दृश्य बघण्याजोगे होते व मुलांना खाऊ देऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

संविधान दिंडीचा महाराष्ट्रभर झाला जागर

बार्टी संविधान दिंडीचा समारोप

सुराज्य/उत्तर सोलापूर आषाढी एकादशी दिनी पंढरपूर येथे बार्टीच्या वतीने घेण्यात आलेल्या संविधान दिंडीचा समारोप राज्याचे कामगार मंत्री तथा माजी सामाजिक न्यायमंत्री सुरेश खाडे यांचे उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी मोहन वानखडे,भाजपा अनुसूचित जाती मोर्चा संघटना मंत्री सुनील सर्वगोड यांच्या हस्ते समारोप करण्यात आला.यावेळी खाडे यांनी सामाजिक न्याय विभाग व बार्टी संस्थेने उत्कृष्ट उपक्रम नियोजित केलेबाबत बार्टीच्या महासंचालक सुनील वारे व

समतादूत विभागाचे विशेष कोतुक केले. असे उपक्रम भविष्यात देखील हाती घ्यावे असे बार्टी संस्थेस सूचित केले.सचिव-सुमंत भांगे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन) यांच्या मुख्य संकल्पनेतुन व आयुक्त, डॉ. प्रशांतजी नारनवरे (समाज कल्याण पुणे) व महासंचालक सुनील वारे (बार्टी) यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी,पुणे यांचेमार्फत संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्या बरोबर दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील संविधान दिंडी चे आळंदी ते पंढरपूर आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुनिल सर्वगोड, जितेंद्र बनसोडे, अरविंद कांबळे, किर्तीपाल सर्वगोड, श्रीकांत कसबे, मुकुंद मागाडे, नागेश रणदिवे, आर.पी.कांबळे, विशाल मांदळे, इंदिरा आरवार, स्नेहल भोसले, डॉ.सत्येंद्रनाथ चव्हाण, रूषाली शिंदे, रवींद्र कदम, आरती भोसले, सतीश पाटील यांनी परिश्रम घेतले.

छ. शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य

✔ सुराज्य/सोलापूर

येथील पी. जी. प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्यावतीने छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी शहर अध्यक्ष भारत जाधव, राष्ट्रवादी नेते सुधीर खरटमल, देवेंद्र भंडारे, बाबा मिस्त्री, करेप्पा जंगम, जुबेर बागवान, हणमंतु सायबोळु, फादर योव्हान कानेपागूल, संजय कुऱ्हाडे, भारत बडुरवाले, मन्नूसिंग बडुरवाले, शिवाजी बनसोडे, अजित बनसोडे, नुतन गायकवाड, पूनम बनसोडे, इरफान शेख, लोकचंद मनसावाले, इकबाल चाचा, घनश्याम शिवशिंगवाले, संजय कुचेकर, संस्थेचे आधारस्तंभ माजी उपमहापौर प्रमोद गायकवाड, संस्थेचे संस्थापक नितीन गायकवाड, युवा नेते लकी गायकवाड आदी उपस्थित होते.

यावेळी पी. जी. प्रतिष्ठानचे कार्यकर्ते योगेश कांबळे, उमेश जेटीथोर, सचिन थोरात, सतीश कांबळे, सॅमसंग कांबळे, श्रीकांत नारायणकर, कोमल माचले, शफीक शेख, रोहित मस्के, हब्बू शेख, फारुक शेख, निप्पू मस्के, संजय गायकवाड, नागेश सोनकांबळे, सागर बनसोडे, अमोल कांबळे, बाळासाहेब सुरवसे, श्रीकांत सावंत, धनराज सोनकांबळे, विशाल लालसरे, युवा मस्के आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

यंदा दहा लाख मेट्रीक टन ऊस गाळप करणार

गोकुळचे उपाध्यक्ष शिंदे यांची माहिती

✔ सुराज्य/अक्कलकोट

चालू गळीत हंगाम सन २०२३-२४ मध्ये प्रतिदिन ६ हजार मेट्रीक टन उस गाळप करून यंदा १० लाख मे टन उस गाळपाचे उदिष्ट ठेवण्यात आल्याचे कारखान्याचे व्हाईस चेअरमन विशाल शिंदे यांनी येथे बोलताना सांगितले.

गोकुळ शुगर इंडस्ट्रिज लिमिटेड धोत्री (ता.दक्षिण सोलापूर) या कारखान्याचा ९ व्या गळीत हंगामाचा मिल रोलर पूजन चेअरमन दत्ता शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आज कारखान्याचे व्हा चेअरमन विशाल शिंदे व मॅनेजिंग डायरेक्टर कपील शिंदे यांच्या हस्ते संपन्न

झाला.यावेळी व्हाईस चेअरमन विशाल शिंदे हे बोलत होते.

पुढे बोलताना विशाल शिंदे म्हणाले की,चालू गाळप उदिष्ट पूर्ण करण्यासाठी ४०० मोठे वाहन व २०० मिनी कार्ट वाहने असे एकूण ६०० वाहने करार करून संबंधित यंत्रणेचा पहिला हप्ता ही अदा करण्यात आल्याचे सांगितले.यावेळी कारखान्याचे एक्झिकेटीव्ह डायरेक्टर प्रदिप पवार, वर्क्स मॅनेजर लवटे, प्रोडक्शन मॅनेजर भावसर, शेती अधिकारी फकरुदिन जहागिरदार,राजकुमार लवटे,श्रीकांत भावसर आदी खाते प्रमुख व सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पिलीव कार्यकारी सहकारी विकास सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी सुळे

पिलीव : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील विविध कार्यकारी सहकारी विकास सेवा सोसायटीच्या चेअरमन व व्हा चेअरमन निवडीसाठी आज सर्व संचालक मंडळाची निवडणूक निर्णय अधिकारी बंडगर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी चेअरमन पदासाठी महादेव सुळे, विठठल मदने, कुबेर भैस यांचे अर्ज आले होते तर व्हा चेअरमनपदासाठी किसन सातपुते यांचा एकमेव अर्ज आला होता यावेळी चेअरमनपदासाठी भरलेल्या अर्जापैकी कुबेर भैस व विठठल मदने सर यांनी आपले उमेदवारी अर्ज माघारी घेतल्यामुळे चेअरमनपदी महादेव ईश्वर सुळे यांची बिनविरोध चेअरमन पदी निवड झाली. सदर निवडीवेळी माजी चेअरमन संग्राम पाटील, माजी व्हा. चेअरमन सुग्रीव लेंगरे, संतोष उर्फ आनंद पाटील, पंकज मदने,कुबेर भैस, नबाजी मदने, पोपट गोडसे, विठ्ठल मदने,जाफर मुलाणी, रंजना जावळे,सुलाबाई जरग उपस्थित होते.

जि.प.प्राथमिक शाळा लेंगरेवस्ती येथे शिक्षकाची नेमणुक करण्याची मागणी

पिलीव : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील लेंगरेवस्ती येथे पहीली ते चौथीपर्यंत वर्ग असणारी शाळा आहे. याठिकाणी दोन शिक्षकाची नियुक्ती आहे पण याठिकाणी गेल्या वर्षभरापासून एकच महीला शिक्षक आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. याठिकाणी चाळीस च्या आसपास विद्यार्थी संख्या आहे. याठिकाणी ताबडतोब शिक्षकाची नेमणुक करण्याची मागणी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नागेश लेंगरे व पालकांनी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती माळशिरस यांना निवेदनाद्वारे केली आहे. ताबडतोब शिक्षकाची नेमणुक करावी नाहीतर आम्हाला आंदोलनाचा पर्याय निवडावा लागेल असा इशारा शाळा व्यवस्थापन समिती व पालकांनी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती माळशिरस यांना दिला आहे. या निवेदनावर सरपंच महावीर धायगुडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नागेश लेंगरे, सदस्या सुजाता माळी, साधना मदने, वैशाली लेंगरे, अर्चना मगर, जयंत लेंगरे,अंकुश लेंगरे, ग्रामपंचायत सदस्य शहाजी लेंगरे, माजी सरपंच तुषार लवटे यांच्या सह्या आहेत.

अनु. जाती-जमातीसाठी स्मशानभूमीची जागा द्या

अक्कलकोट : कल्लुप्पावाडी येथील गट नंबर १८४/१ मधील अनुसूचित जाती जमातीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने स्मशानभूमीला जागा संपादन झालेली आहे. तेव्हापासून आजतागायत जे पूर्वपार रस्ता होता तो रस्ता स्मशानभूमी शेजारील गट नंबर १८३ पैकी खातेदार सिध्दाराम मतप्पा परमगोळ यांनी स्मशानभूमीचा रस्ता अडवलेला आहे. तो रस्ता पंचनामा करून ताबडतोब रहदारासाठी व अंत्यविधीसाठी रस्ता खुला करून द्यावा अन्यथा दि. ५ जुलैनंतर लहुजी शक्ती सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, अशा आशयाचे निवेदन लहुजी शक्ती सेना जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांच्या वतीने तहसीलदार अक्कलकोट यांना देण्यात आले आहे. याप्रसंगी लहुजी शक्ती सेना जिल्हाध्यक्ष वसंत देडे, अक्कलकोट शहर कार्यवाहक सद्दाम शेख, तालुका अध्यक्ष हरी देडे, अक्कलकोट शहर अध्यक्ष राम बेळळे आदी उपस्थित होते.

माढ्यातील विठ्ठलाच्या आद्यमूर्तीची पहाटे महापूजा

माढा : माढा येथील विठ्ठल मंदिरातील विठ्ठल रुक्मिणीची महापूजा शिवाजी बलभीम जगदाळे, माढा नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षा कल्पनाताई शिवाजी जगदाळे, गुरुराज कानडे, भाग्यश्री कानडे, वैजिनाथ राऊत, विद्या राऊत तसेच माढा न्यायालयाचे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर अखिल जैन यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी माढा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा मीनलताई साठे व दादासाहेब साठे, नगरसेविका अर्चनाताई कानडे, सुनीताताई राऊत, माजी नगरसेविका गीताताई देशमुख, महेश चवरेपूजारी, बापूसाहेब कुंभेजकर, नाना कुंभेजकर, प्रा. युवराज जगदाळे, इंजिनिअर संग्राम राऊत, गणेश भांगे, सचिन कानडे, अमोल कानडे उपस्थित होते.

निधन वृत्त

जवान मच्छिंद्र अडसूळ

बार्शी : एस आर पी एफ जवान मच्छिंद्र महादेव अडसूळ (रा.बार्शी) यांचे २८ जून रोजी दौंड येथे अकस्मात निधन झाले. त्यांच्यावर बार्शी येथील मोक्षधाम याठिकाणी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांना मानवंदना देण्यात आली. मच्छिंद्र अडसूळ यांच्या पश्चात पत्नी, आई, एक लहान मुलगा, असा परिवार आहे. ते भटक्या विमुक्त जाती जमाती संघटनेचे नेते नागेश अडसूळ यांचे पुतणे होत.

रत्नाबाई शेळके

सोलापूर : रत्नाबाई भीमाशंकर शेळके यांचे शुक्रवारी वयाच्या ८० व्या वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दि. ३० रोजी सायंकाळी ५ वाजता बरूर ता.दक्षिण सोलापूर येथील त्यांच्या राहत्या घरापासून निघणार आहे. सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेळके यांच्या त्या मातोश्री होत.

कुर्डुवाडीत निर्भया पथक नेमण्याची गरज

शाळा, महाविद्यालयीन मुलींना रोडरोमिओचा त्रास

सुराज्य/कुर्डुवाडी

उन्हाळ्याच्या सुट्टी संपल्या शाळा व महाविद्यलये सुरु झाली असून शाळा, महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांनी ना दरवर्षी शाळा महाविद्यलयाच्या बाहेर व एस.टी. स्थानक ते शाळा दरम्यान रोडरोमियोचा शालेय व महाविद्यलयीन मुलींना त्रास होत असतो.कागदावर असलेले निर्भया पथक मात्र या गंभीर बाबी कडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. कुर्डुवाडी पोलीस ठाण्यात निर्भया पथक नेमून रोडरोमयोचा बंदोबस्त करण्याची मागणी पालकामधून होत आहे.

कुर्डूवाडीत दरवर्षी शाळा सुरू झाल्या नंतर रोड शाळा भरण्याच्या वेळेस व सुटण्याच्या वेळेस रोमियोचा त्रास सुरू होतो. कुर्डुवाडी हे तालुक्यतील महत्त्वाचे शहर आहे.शहरात चारही बाजूला शाळा व कनिष्ठ महाविद्यालये आहेत. शिक्षण ,उच्च शिक्षणासाठी ग्रामीण भागातील मुली कुर्डुवाडी शहरात येत असतात शहरात आल्यानंतर शाळा महाविद्यालयाच्या रस्त्यावर एस.टी. स्टॅण्ड पासून शाळेपर्यंत जाण्याच्या मार्गावर पाठलाग,गलिच्छ शेरेबाजी व छेडछाड हे नित्याचेच होते .

रोडरोमियो दहशत निर्माण करत असल्यामुळे यावर तक्रार करायला कोणी पुढे येत नाही. आणि एखादी तक्रार झालीच तर तक्रारदारावर दबाव येण्यास सुरुवात होते. यामुळे मांजराच्या गळ्यात कोण घंटा बांधणार असा यक्ष प्रश्न निर्माण होतो.

ग्रामीण भागातून येणाऱ्या मुली घरी किंवा शाळा,महाविद्यालयात तक्रार केल्यानंतर गैरसमज निर्माण होऊन शिक्षण बंद होण्याच्या भीतीने मुली पालक किंवा शिक्षकांना काही सांगत नाहीत.शहरातील मुली शिकवणी क्लासेस साठी पहाटे व सकाळच्या सुमारास घरातून बाहेर पडतात

अगदी सकाळी सकाळी हे रोडरोमिओं ठिकठिकाणी थांबलेले असतात.

शिवाय या रोडरोमियोच्या पाठीमागे अदृश्य शक्ती असल्याने यांच्या विरोधात मोठी कारवाई होत नाही. किरकोळ समज देऊन सोडून दिल्याने मनोधैर्य वाढत असून पालकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.सकाळी झालेल्या अश्लील शेरेबाजी व छेडछाडीमुळे दिवसभर होणाऱ्या शिक्षणावर व अध्ययनावर विपरीत परिणाम होतो.

या ठिकाणी असतात रोडरोमियो

शहरातील म्हसोबा गल्ली , विठ्ठल मंदिर परिसर ,पटेल चौक परिसर,नगरपालिकेची महात्मा फुले महाविद्यलय,डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यालय ,नूतन विद्यालय,आंतर भारती विद्यालय परिसर, पोस्ट रोड, बस स्थानक आदी ठिकाणी शाळा सुरू होण्याच्या व सुटण्याच्या सुमारास रिकामटेकड्या तरुणांचे टोळके उभे असते. निर्भया पथकाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे काही पालक संतापून रोडरोमियोचा बंदोबस्त करण्यासाठी पुढे येत असल्याचे दिसत आहे.

अल्पवयीन मुलीला जीवे ठार मारण्याची धमकी

सुराज्य/कुर्डुवाडी

सोशल मीडियावरील फ्रेंड रिक्वेस्ट एक्सेप्ट कर आणि माझे नाव घरी सांगितले तर तुला जीवे मारून टाकीन, अशी धमकी एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीला दिल्याप्रकरणी कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २९ रोजी सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास घडली.

१३ वर्षाची मुलगी शाळेतून घरी येत असताना आरोपी उमेश डोंगरे (रा. कुर्डु ता. माढा) हा तुला मी पाठवलेली सोशल मिडियावरील फ्रेंड रिक्वेस्ट का एक्सेप्ट केली नाही. ती एक्सेप्ट कर आणि माझे नाव जर घरी सांगितले तर तुला जीवे मारून टाकीन अशी धमकी देत होता. शिवाय गेल्या महिन्यापासून अल्पवयीन मुलीचा तो पाठवला करीत होता. दि. २९ जून रोजी तरुणी शाळेचे साहित्य घेण्यासाठी दुकानात गेली असताना यातील आरोपी उमेश डोंगरे यांनी तरुणींचा पाठलाग करुन तिला जीवे ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात बाललैंगिक अपराध संरक्षण अधिनियम प्रमाणे उमेश डोंगरे याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिलीव येथे भरधाव वेगाने आलेल्या स्कॉर्पिओ गाडीने मोटरसायकलस्वारास उडविले

तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

सुराज्य/पिलीव

पिलीवहून पंढरपूर कडे जाणाऱ्या तरुणास पंढरपूर वरून भरधाव वेगाने येणाऱ्या स्कॉर्पिओ गाडीने विठ्ठलवाडी येथे जोराची धडक दिल्याने तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

पिलीव पोलीसांकडून मिळालेली सविस्तर माहिती अशी की बाबा बाळू चव्हाण (रा.हिंगणी,ता.माण,जि. सातारा) हा तरुण आपल्या एम.एच.१३-सीएम०७३७ या क्रमांकाच्या एचएफ डिलक्स या मोटारसायकलवरुन पंढरपूरला जात असताना पिलीव-पंढरपूर रोडवर विठ्ठलवाडी येथे पंढरपूरहून येणाऱ्या एमएच ४२ के ५४९० या क्रमांकाच्या स्कॉर्पिओ गाडीने समोरुन जोराची धडक दिल्याने तरुणाचा सातारा येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला .सदर प्रकरणाची माहिती मिळताच पिलीव औट पोस्टच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. प्रकरणाची चौकशी केली असता अपघातातील स्कार्पिओ गाडी ही विश्वजीत जयसिंग घोरपडे (रा.भाडळी,ता.कोरेगाव,जि. सातारा) यांची असल्याचे समजले.

यावेळी पिलीव पोलीसांनी लागलीच घोरपडे यांच्यावर माळशिरस पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद केला असून अपघातातील स्कार्पिओ गाडी जप्त केली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पिलीव औट पोस्टचे हवालदार पंडित मिसाळ हे करीत आहेत.

'आय लव पाकिस्तान' फुगे प्रकरण

मुख्य सूत्रधारावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा : बरडे

सुराज्य/सोलापूर

बकरी ईद निमित्त सोलापुरातील विजापुर रोडवरील ईदगाह मैदानावर नमाज अदा झाल्यावर आय लव पाकिस्तान, पाकिस्तान जिंदाबाद व पाकिस्तानी झेंडा असलेल्या फुगे विकणाऱ्याच्या मागे असेलल्या सुत्रधारावर देश द्रोहाचा गुन्हा दाखल करा. अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख पुरूषोत्तम बरडे यांनी पोलिस प्रशासनाकडे केली आहे.

मुस्लिम समाजाचा बकरी ईद सन असल्याने संपूर्ण नमाज अदा करण्यात आली त्यापैकी विजापुर रोड वरील मैदानावर नमाज अदा झाल्यानंतर आय लव्ह पाकिस्तान असे मजकुर असलेले फुगे विक्री करणाऱ्या अजय अमन पवार व शिवाजी लक्ष्मण पवार या फुगे विक्रेत्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. खऱ्या गुन्हेगारांचा शोध घेऊन गुन्हादाखल करावा अशी मागणी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हा प्रमुख पुरुषोत्तम बरडे यांच्या नेतृत्वाखाली व शहरप्रमुख विष्णु करामपुरी महाराज यांच्या उपस्थितीत शिष्ट मंडळाद्वारे पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांना दिले आहे.

वारीत आत्मा आणि मनाचा शोध घेता येतो : डॉ. कराड

सुराज्य/पंढरपूर

ईश्वर ही व्यक्ती नाही तर एक शक्ती आहे. त्यामुळेच वारकरी वारीत आत्मा आणि मनाचा शोध येत पांडुरंगाच्या चरणी सर्वस्व अर्पण करतो. वारी ही आंतर बाह्य स्वच्छतेबरोबरच आम्हास विनम्रता शिकविते. असे विचार विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा.कराड यांनी व्यक्त केले

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत, श्री क्षेत्र आळंदी-देहू-पंढरपूर परिसर विकास समितीच्या वतीने पवित्र चंद्रभागेची आरतीचा नित्य उपक्रमाचा एक भाग म्हणून आषाढ शुध्द एकादशीच पूर्व संध्येलाभक्त पुंडलिक घाटावर अभिनेता संदीप पाठक यांच्या हस्ते चंद्रभागेची आरती संपन्न झाली. त्यावेळीते बोलत होते. या प्रसंगी अभिनेता संदीप पाठक, डॉ. रश्मी शेटकर, सज्जनगडाचे अजित गोसावी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच ह.भ.प. तुळशीराम कराड, प्रगतिशील शेतकरी काशीराम कराड ,विश्व शांती दिंडीच्या अध्यक्ष उषा विश्वानाथ कराड, प्रा. स्वाती कराड चाटे, डॉ.सुचित्रा कराड नागरे, ह.भ.प.डॉ.सुदाम महाराज पानेगावकर, दत्तात्रय बडवे आणि प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, आज संपूर्ण जगाला याच ज्ञान पंढरीतून सुख, समाधान आणि शांतिचा मार्ग दाखविला जाणार आहे. अशावेळेस सरकार आणि वारकऱ्यानी चंद्रभागेच्या नदीच्या दोन्ही तिरावर संत ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या नावाने सर्वोत्कृष्ट घाटांची निर्मिती करावी.

डॉ. सुदाम महाराज पानेगावकर म्हणाले, या सृष्टीवर जोपर्यंत सूर्य चंद्र तारे आहेत तोपर्यंत भक्त पुंडलिकाचे नाव असेल. आई वडिलांच्या पुण्याईने आम्ही आज येथे पोहोचलो आहोत. तसेच, चंद्रभागेची आरती करण्याची जी संधी सर्वांना मिळाली आहे ते परम भाग्यच समजावे. विश्व शांती केंद्र (आळंदी) चे हभप शालिग्राम महाराज खंदारे यांनी सूत्रसंचालन केले.

मोहोळ तालुका काँग्रेसची कार्यकारणी जाहीर

सहा उपाध्यक्ष, पाच संघटक, चार सरचिटणीस, सात चिटणीस यांचा समावेश

सुराज्य/मोहोळ

मोहोळ तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुलेमान तांबोळी यांनी तालुका काँग्रेसची कार्यकारिणी जाहीर केली.यामध्ये सहा उपाध्यक्ष,पाच संघटक, चार सरचिटणीस, सात चिटणीस,एक प्रसिध्दी प्रमुख आणि सात कायम निमंत्रितांचा समावेश आहे.

उपाध्यक्ष: सिध्देश्वर दत्तू वराडे (इंचगाव),राजेंद्र शिवाजी मोटे(नरखेड) गणेश शिवाजी शेटे (कोन्हेरी) अविनाश राजन टेळे (शिंगोली) ज्ञानेश्वर भगवान पाटील(वाघोली), राजेंद्र भगवान सर्जे (देवडी),धर्मराज विष्णू वसेकर (टाकळी सिकंदर) संघटक: विजयकुमार श्रीपती पवार(कोरवली) सत्यवान महादेव तरटे(सावळेश्वर) ज्ञानेश्वर तुकाराम कदम(कुरुल) महादेव अर्जुन सुरवसे(वडदेगाव) तय्यब तालुकादार शेख (नरखेड) सरचिटणीस: संतोष शिवाजी शिंदे(मोहोळ) वैभव उध्दव कुचेकर(अर्धनारी) मनोज अशोक धडके(बेगमपूर) अजित महादेव जगताप(सोहाळे) चिटणीस: कुलदीप हरी पवार(वडदेगाव) आप्पासाहेब कुबेर गायकवाड(जामगाव बु) विलास भीमराव माने(सौंदणे) सिद्राम बब्रुवान बचुटे(वरकुटे) आनंद कुशाबा गायकवाड(येणकी) ज्योतिराम भारत जगताप(सोहाळे) प्रसिध्दी प्रमुख दादासाहेब श्रीराम गायकवाड (कामती बू) कायम निमंत्रीत बाबासाहेब क्षीरसागर (माजी सभापती पं.स. मोहोळ)सुभाष पाटील (माजी अध्यक्ष काँग्रेस आय) श्रीम. शाहीन शेख(माजी नगराध्यक्ष),अशोक देशमुख(माजी अध्यक्ष),देवानंद गुंड-पाटील,अरुण आण्णा पाटील (माजी जि.पं.सदस्य),राजशेखर पाटील

गुरूभेट मंदिराजवळ दुचाकीची धडक

सुराज्य/सोलापूर

फिर्यादी अविनाश मुरलीधर कुचेकर (वय-४५,रा. संजय नगर,कुमठा नाका) हे त्यांच्या दुचाकी क्रमांक एमएच.१३.बीवाय.७४४७ जाहिराती घेण्यासाठी सात रस्ता येथुन रंग भवन विजापूर वेस,दत्त चौकाकडे जात असताना पाठीमागून येणाऱ्या अज्ञात दुचाकी वरील चालकाने भरधाव वेगात दुचाकी चालवून फिर्यादी यांना जोरात धडक देऊन गंभीर दुखापत केली आहे.तसेच दुचाकीचे नंबर प्लेट,उजव्या बाजूचा आरसा फुटून नुकसान होण्यास कारणीभूत झाला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. ही घटना २१ जून रोजी दुपारी साडेपाच वाजण्याच्या सुमारास गुरु भेट मंदिर जवळ रंग भवन येथे घडली. याप्रकरणी अविनाश कुचेकर यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात दुचाकी चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक माडे हे करीत आहेत.

अन्नछत्र हे तेजस्वी, ओजस्वी, सबल बनवणारे केंद्र : बानगुडे-पाटील

सुराज्य/अक्कलकोट

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यकाळातील परंपरा जपण्याचे कार्य श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले व त्यांचे पुत्र प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले हे करीत आहेत. अन्नछत्र हे तेजस्वी, ओजस्वी, सबल बनविणारे केंद्र आहे. ब्रह्मांडनायक श्री स्वामी समर्थ महाराज या धर्म कार्याला कोणतीच अडचण येऊ देणार नाहीत, असे प्रतिपादन व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांनी केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३६ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सवनिमित्त न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून गुरुवार सायंकाळी ७ वा. व्याख्यान' विषय - सेवाभाव-अन्नदान व छत्रपती शिवाजी महाराज या विषयावर ख्यातनाम व्याख्याते नितीन बानुगडे-पाटील यांचे व्याख्यानाने ७ वे पुष्प संपन्न झाले.

पुढे बोलताना नितीन बानुगडे-पाटील यांनी म्हणाले की, आंध्रप्रदेश येथील श्रीशैल मल्लिकार्जुन मंदिराकडे येण्या-जाण्याकरिता त्याकाळात छत्रपती शिवाजी महाराजांनी घाट बांधले. त्यांचे हे मोठे महान कार्य पाहून, घाट बांधणाऱ्या मजुरांनी स्ववर्गणीतून मंदिराच्या गोपुराच्या उत्तर बाजूस असलेल्या चौथ्या मजल्यावरील कमानीत छत्रपती शिवाजी महाराजांची कोरीव मुर्ती आजही पाहायला मिळते. छत्रपतींच्या काळातील जिवंत स्मारक असल्याचे सांगून, कर्नाटक राज्यातील छत्रपतीनी स्वराज्यसाठी केलेल्या कार्याबाबत संपूर्ण माहिती त्यांच्या खास शैलीत सांगितले.

या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन आमदार चैनसुख संचेती, दिलीपभाऊ कोल्हे, अशापक बळोरगी, दिलीप सिध्दे, संजय देशमुख, वैभव नागणे, अभिनंदन गांधी, बाबासाहेब निंबाळकर, मोहन डांगरे, प्रमोद मोरे, विश्वनाथ भरमशेट्टी, महेश हिंडोळे, रमेश बारस्कर, शेखर, अभिजी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, संगीता भोसले, पिंटू शिंदे, निखील पाटील, प्रवीण घाटगे, गोटू माने, विराज माणिकशेट्टी, अमित थोरात, बाळासाहेब घाटगे, बाळासाहेब पोळ, अरविंद शिंदे, प्रथमेश पवार, सौरभ मोरे, राहुल इंडे, महादेव अनगले व राजेंद्र पवार, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, प्रसन्न बिराजदार, उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले. तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी आभार मानले.

गुणीजन गौरव :- यामध्ये विशेषगौरव पुरस्कार धनेश आचालेर, बोरामणी व अक्कलकोट ग्रामीण सर्कल (महसूल क्षेत्र) ओंकार माने, पंचायत समितीचे रंगनाथ निकम, प्रा. प्रकाश सुरवसे, युवा उद्योजक सचिन उपरे, गोगावाचे माजी सरपंच प्रदीप जगताप यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

महत्त्वाचे वृत्त

भक्त-भाविकांना विठुरायाचे आगळे-वेगळे दर्शन

सोलापूर : आपल्या प्रेक्षकांना मनोरंजनाबरोबरच अध्यात्माचा एक वेगळा अनुभव देण्याचं काम शेमारू मराठीबाणा वाहिनी आपल्या विविध कार्यक्रम आणि उपक्रमांमधून नेहमीच करत असते. मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी पंढरपूरच्या वारी निमित्त शेमारु मराठीबाणा वाहिनीने आणला आहे एक खास उपक्रम. ज्यामध्ये प्रेक्षकांना, भक्त-भाविकांना विठुरायाचे आगळे वेगळे दर्शन घडणार आहे. इतकंच नव्हे तर विठ्ठल मंदिराच्या गाभऱ्यात बसून आपल्या लाडक्या विठ्ठलाशी संवादही साधता येणार आहे. तेही पंढरपूरला पोहचण्याआधीच आणि हेच या उपक्रमाचं वैशिष्ट्य आहे. पंढरपूर येथील विठ्ठल मंदिराच्या गाभाऱ्याची प्रतिकृती असलेला दोन भव्य कँटर शेमारू मराठीबाणा वाहिनी तर्फे तयार करण्यात आले आहेत.

लावणीचा महामंच ढोलकीच्या तालावर भेटीला

सोलापूर : कलर्स मराठीवरील लोकप्रिय कार्यक्रम 'ढोलकीच्या तालावर' लावणीचा महामंच परततोय एक नव्या बहारदार पर्वासोबत. या पर्वाचे परीक्षक असणार आहेत, अष्टपैलू अभिनेत्री क्रांती रेडकर, सुप्रसिध्द निर्माते, दिगदर्शक आणि लेखक अभिजीत पानसे आणि नृत्य दिग्दर्शक आशिष पाटील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय केळकर करणार आहे. तेंव्हा 'ढोलकीच्या तालावर' आजपासून शनि आणि रवि रात्री ९.०० वा फक्त कलर्स मराठीवर नक्की बघा.

पावसाचा हाहाकार, रस्त्यांवर पाणीच पाणी

मुंबई : मागील काही दिवसांपासून मुंबईसह उपनगरात पावसाची तूफान बॅटींग सुरू आहे. आज सकाळपासूनच मुंबई आणि उपनगरमध्ये तूफान पाऊस झाला. अनेक रस्ते जलमय झाले आहेत. रेल्वेसह रस्ते वाहतूक देखील विस्कळीत झाली आहे. मुंबईच्या पूर्व द्रुतगती मार्गावर चेंबूरपासून सायनपर्यंत मोठी वाहतूककोंडी झाली आहे. या कोंडीचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसला आहे. वाहनांच्या लांब रांगा लागल्याने, थोडे अंतर कापण्यासाठी मोठा वेळ लागत आहे. अंधेरी सबवेमध्ये तब्बल तीन ते चार फूट पाणी साठल्याने हा मार्ग नागरिकांसाठी बंद करण्यात आला होता.

'गोकुळ' मध्ये अनियमितता, कारवाई इशारा

कोल्हापूर : गोकुळ दूध संघाच्या लेखापरीक्षणात अनियमितता आढळली आहे. संघाला खुलासा करण्याचे आदेश दिले असून त्याचा अहवाल राज्य सरकारला प्राप्त झालेला नाही. लेखापरीक्षणात अनियमितता स्पष्ट झाल्यानंतर गोकुळ वर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महसूल तथा दूध विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शुक्रवारी येथे पत्रकारांशी बोलताना दिला. गोकुळ दुध संघात्तील गैर कारभाराविरोधात विरोधी संचालिका शौमिका महाडिक यांनी राज्य शासनाकडे तक्रार केल्यानंतर त्याचे विशेष लेखापरीक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

लग्नात नाचगाण्यावेळी गोळीबार, तरुण जखमी

सांगली : लग्नानिमित्त सुरु असणाऱ्या नाचगाण्यावेळी हवेत केलेल्या गोळीबारात एक तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना भाटशिरगाव (ता. शिराळा) येथील देसाई वस्तीवर घडली. अवधूत देसाई यांच्या लग्नानिमित्त रात्री नाचगाण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी ऋषी इंगळे, अजय इंगळे, सनी गायकवाड हे देसाई वस्तीवर गेले होते. यावेळी ओंकार देसाई याने रिव्हॉल्व्हरमधून हवेत गोळीबार केला. यातील गोळी ऋषी देसाई यांच्या डाव्या दंडात घुसली. यामुळे तो गंभीर जखमी झाला. या प्रकरणी ओंकार देसाई व संजय देसाई फौजी या दोघांना अटक करण्यात आली आहे.

राज्य परीक्षा परिषदेचे राज्य मंडळात स्थलांतर

पुणे : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या नव्या इमारतीचे बांधकाम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे राज्य परीक्षा परिषदेचे कार्यालय राज्य मंडळात तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरित करण्यात आले असून, नव्या इमारतीचे काम पूर्ण होईपर्यंत परीक्षा परिषद राज्य मंडळातून चालवली जाणार आहे. पुण्यातील डॉ. आंबेडकर रस्ता येथील लाल देवळासमोर राज्य परीक्षा परिषदेचे कार्यालय आहे. परीक्षा परिषदेतर्फे विभागीय परीक्षा, व्यावसायिक परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा आदींचे आयोजन केले जाते.

पाक कलाकारांसोबत मनसेचा खळ्ळखट्याक

मुंबई : एकीकडे भारत पाकिस्तान क्रिकेट सामन्यामुळे हे दोन्ही देश आमने-सामने येणार असताना आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या चित्रपट सेनेचे अध्यक्ष अमेय खोपकर यांनी पाकिस्तानी खेळाडू आणि कलाकारांना सज्जड दम दिलाय. पाकिस्तानी कलाकार भारतीय चित्रपट किंवा मालिकांमध्ये दिसले तर खळ्ळखट्याक केला जाईल, असा इशाराच त्यांनी दिला आहे. पाकिस्तानी कलाकारांवरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने नेहमीच रान उठवलं आहे. पाकिस्तानी कलाकार कोणत्याही भारतीय कलाकृतीत दिसला की मनसेने संबंधित निर्मात्यांविरोधात नेहमीच खळ्ळखट्याक केला आहे.

सांगलीत तरुण दाम्पत्यांनी केली आत्महत्या

सांगली : तासगाव तालुक्यातील येळावी येथे तरुण दांपत्याने विष पिऊन आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी घडली. लग्नाला एक वर्ष पूर्ण होण्यास एक महिन्याचा अवधी कमी असताना दोघांनी एकत्रितपणे टोकाचे पाऊल उचलल्याने हळहळ व्यक्त होत आहे. राज संजय जाधव (वय २३) आणि ऋतुजा जाधव (२०) या दोघांनी घरात बुधवारी रात्री विष प्यायले. सकाळी राज उलट्या करत होता, तर त्याची पत्नी बेशुध्द पडली होती. दोघांनाही तात्काळ रुग्णालयात नेले. मात्र उपचार सुरु असताना दोघांचा मृत्यू झाला. राजचे शिक्षण बी.एससी. ॲग्री झाले होते. नोकरी नसल्याने तो घरच्या शेती व्यवसायातच कार्यरत होता.

अपघातात पती-पत्नीसह चिमुरडा ठार

अहमदनगर : शिर्डी जवळील कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण शिवारात समृध्दी महामार्गावर भीषण अपघात झाला. आयशर वाहनाला मागून क्रुझर वाहनाने धडक दिल्याची घटना शुक्रवारी रात्री एक वाजताच्या सुमारास घडली. या दुर्दैवी घटनेत पती-पत्नीसह दीड वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाला. संतोष अशोक राठोड (वय ३५) त्यांची पत्नी वर्षा संतोष राठोड (वय २९) आणि मुलगी अवनी संतोष राठोड दीड वर्ष अशी मयतांची नावे आहेत. दरम्यान, या दुर्घटनेत संतोष राठोड यांचा पाच वर्षाचा मुलगा अर्णव याच्यासह इतर पाच ते सहा जण जखमी असून त्यांच्यावर आत्मा मालिक रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

अल्पवयीन मुलीवर गँगरेप

बीड : बीडमधील काही अंतरावर असलेलं खापर पांगरी गाव येथील १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर पाच ते सहा जणांनी सतत लैंगिक अत्याचार केला. या अत्याचारामधून पीडिता साडेसहा महिन्यांची गर्भवती राहिली. मात्र, या नराधमांना हे लक्षात येतात पिडितेच्या घरच्यांना धमकवण्याचा आणि गर्भपात करण्यास सांगत राहिले. गर्भपात नाही केला तर तुम्हाला आणि मुलीला मारून टाकण्याची धमकी देखील या नराधामांनी दिली. मात्र, तरी देखील गर्भपात न केल्याने या नराधमांनी पिडितेला आणि आई-वडिलांना एका अज्ञात स्थळी नेऊन ठेवले असल्याची तक्रार मुलीच्या चुलत भावाने राज्य महिला आयोगाकडे दिली आहे.

७० महिलांशी अश्लील चाळे

कोल्हापूरच्या बोगस डॉक्टराच्या हाती बेड्या

सुराज्य/कोल्हापूर

कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील मुरगुडमध्ये डॉक्टर पेशाला काळीमा फासणारी घटना काही दिवसांपूर्वी समोर आली होती. एका बोगस डॉक्टरने त्याच्या रुग्णालयात आलेल्या महिलांशी अश्लील चाळे करत त्याचे व्हिडिओ शूट केल्याचा प्रकार समोर आला होता. याप्रकरणी आरोपीला बेड्या ठोकण्यात आता पोलिसांना यश आले आहे. दत्तात्रय शामराव कदम असे या बोगस डॉक्टरचे नाव आहे.

त्याच्या विरोधात मुरगुडमध्ये मोर्चाही निघाला होता, मात्र इज्जत आणि भीतीपोटी कोणीही पुढे येऊन तक्रार देण्यास तयार नसल्याने पोलिसांनी स्वतःच गुन्हा दाखल करून ही कारवाई केली आहे. दरम्यान अटक टाळण्यासाठी सदर व्यक्तीने शर्थीचे प्रयत्न केले मात्र, अखेर पोलिसांनी त्याला बेड्या ठोकत गुन्हा दाखल केला.

काही महिन्यांपूर्वी कोल्हापुरातील कागल तालुक्यातील मुरगुड गावात ही घटना समोर आली होती. येथील या बोगस डॉक्टरने महिलांशी अश्लील चाळे केल्याच्या सुमारे ७० ते ८० क्लिप व्हायरल झाल्या होत्या. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. याबद्दल मुरगुडमधील तब्बल ४०० जणांनी पत्र लिहित सदर डॉक्टरवर कारवाई करण्याची मागणी केली होती. या सर्व क्लिप त्या डॉक्टरने स्वतःच तयार केल्या असल्याचे बोलले जात होते. या विकृत डॉक्टरने त्याचा लॅपटॉप दुरुस्तीसाठी दिल्यानंतर हा सर्व प्रकार समोर आला.

त्याने लॅपटॉपमध्ये अनेक क्लिप संग्रहीत करून ठेवल्या होत्या. यामधील अनेक क्लिप सोशल मीडियावर पसरल्या होत्या. ज्यात बहुतांशी महिलाही स्थानिकच होत्या. यामुळे या बोगस डॉक्टरांवर कारवाई व्हावी यासाठी मुरगुड शहरात मोर्चा निघाला होता, तर शिवसेनेकडून देखील तत्कालीन पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांना निवेदन देत त्याच्यावर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, मोर्चा निघूनही कोणीच तक्रार देण्यासाठी पुढे येत नसल्याने पोलिसांनी या प्रकरणात स्वत: गुन्हा दाखल केला होता.

मुरगुड शहरातील निनावी पत्रे, विविध माध्यमातून प्रसिध्द झालेल्या बातम्या तसेच निनावी पत्रातून होत असलेल्या व्हिडिओ चित्रीकरणाची चर्चा, डॉ. कदमचे नग्न स्वरुपातील फोटोंच्या प्रसारित झालेल्या झेरॉक्स प्रती या पार्श्वभूमीवर योग्य तो तपास होण्यासाठी पोलीस निरीक्षक विकास बडवे यांनी फिर्याद दाखल केली होती. या सर्व पुराव्याच्या आधारे या बोगस डॉक्टरला बेड्या ठोकण्यात आल्या.

दोन दिवसांची दिली पोलीस कोठडी

दत्तात्रय कदम अटकेनंतर न्यायालयात हजर केले असता दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान या बोगस डॉक्टरकडून अटक टाळण्यासाठी भरपूर प्रयत्न केले. अटकपूर्व जामीन मिळावी यासाठीही तो धडपडत होता. मात्र, त्याचा अर्ज फेटाळून लावण्यात आला आणि त्याला अटक करण्यात आले आहे.

समान नागरी कायदा विधेयक पावसाळी अधिवेशनातच

सुराज्य/नवी दिल्ली

सध्या देशभरात समान नागरी कायद्यावरून जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही या कायद्याचं समर्थन करणारी भूमिका जाहीरपणे मांडली असताना विरोधकांनी त्यावरून सरकारला लक्ष्य केलं आहे. समान नागरी कायदा फक्त धर्माच्या बाबतीतच नसून ईडी-सीबीआयच्या कारवायांमध्येही लागू करावा अशी खोचक टिप्पणी ठाकरे गटाचे मुख्य प्रवक्ते संजय राऊत यांनी येतली आहे. या पार्श्वभूमीवर हे विधेयत नेमकं कधी संसदेत मांडलं जाणार? याची चर्चा चालू असतानाच पावसाळी अधिवेशनातच ते संसदेत येणार असल्याचं सांगितलं जात आहे.

भारतीय जनता पक्षाकडून समान नागरी कायद्याचं समर्थन केलं जात असून लवकरात लवकर हा कायदा संसदेत मंजूर करून घेण्यासाठी सरकार प्रयत्न करणार असल्याचं भाजपाकडून सांगितलं जात आहे. या पार्श्वभूमीवर देशभरात यावरून प्रतिक्रिया उमटत आहेत. एमआयएम पक्षाचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनी यासंदर्भाच आक्रमक भूमिका येतली असून कायद्याला विरोध केला आहे. तर दुसरीकडे आम आदमी पक्षाचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांनी समान नागरी कायद्याला तत्वत: पाठिंबा दिला आहे.

बारा वर्षात लग्नपत्रिकांपासून पक्ष्यांसाठी तयार केली २१०० घरटी

सुराज्य/नागपूर

लग्नाचा सिझन म्हणजे घरी कुणा ना कुणाकडील लग्नपत्रिका येऊन पडलेल्या. हल्ली तर या लग्नपत्रिकांचा आकारही मोठा. लग्नसोहळा आटोपल्यावर त्यांचे करायचे काय? एकतर ते अग्नीच्या स्वाधीन करायचे, नाही तर फेकून द्यायचे. त्याचाही योग्य उपयोग होऊ शकतो, कुणाला तरी त्यातून निवारा मिळू शकतो हे तुमच्या-आमच्या गाठीही नसेल, पण सेवानिवृत्त ७२ वर्षीय अशोक तेवानी यांनी ते करून दाखवलंय. या लग्नपत्रिकांपासून गेल्या १२ वर्षांत त्यांनी तब्बल २१०० घरटी तयार केली आणि त्यात आता वेगवेगळ्या पक्ष्यांनी त्यांचा संसार थाटलाय.

आपणही या समाजाचे काही तरी देणं

लागतो, ही भावना जोपर्यंत मनात जागृत होत नाही, तोपर्यंत समाज उपयोगी काम तुमच्या हातून घडणार नाही. म्हणूनच त्यांनी चिमणी पाखरांसाठीचं घरकुल तयार करण्याचे काम सुरू केले. बँकेतून निवृत्त झाल्यानंतर अशोक तेवानी यांनी निवृत्तीनंतरचा प्लॅन आधीच तयार केला होता. त्यानुसार ते दिवसभरातील पाच ते सात तास काम करून रोज एक ते दोन घरटे तयार करतात.

आतापर्यंत सुमारे २१०० घरटे त्यांनी लोकांना वितरित केले आहेत. त्या घरट्यात ज्यावेळी चिमणी राहायला येते, अंडी देते, किंवा लहान पाखरांचा जन्म होतो. ते व्हिडिओ लोक मला आवर्जून पाठवतात. ते बघून मला यापेक्षा आणखी चांगलं काम करण्याची ऊर्जा मिळते, असं अशोक तेवानी सांगतात.

४० रुपयात तयार होते घरटे

अशोक तेवानी गेल्या १२ वर्षांपासून चिमणी पाखरांची घरटे तयार करत आहेत. सुरुवातीला बरेच वर्षे त्यांनी हे घरटे निशुल्क वितरित केले. मात्र, फुकट मिळालेल्या वस्तूंची लोकांना किंमत नसते याबाबतीतील काही अनुभव त्यांना आले. त्यामुळे घरटे तयार करण्यासाठी लागणारी साहित्याची किंमत म्हणून ४० रुपये घेण्यास सुरुवात केली.

तरुणीवरील हल्ल्याप्रकरणी हवालदारासह तिघे निलंबित

सुराज्य/पुणे

मंगळवारी (ता. २७ जून) पुण्यात भरदिवसा एकतर्फी प्रेमातून तरुणीवर कोयत्याने हल्ला करण्यात आला. लेशपाल जवळगे आणि हर्षद पाटील या दोन तरुणांनी या घटनेत दाखवलेल्या धाडसामुळे त्या तरुणीचे थोडक्यात प्राण बचावले आहे. पण या घटनेत पोलिसांनी दाखवलेल्या हलगर्जीपणामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

सदाशिव पेठेत ज्या ठिकाणी ही घटना घडली, त्या ठिकाणापासून हाकेच्या अंतरावर पोलीस स्टेशन असताना देखील पोलिसांनी घटनास्थळी यायला २० मिनिटे लावल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींकडून देण्यात आली. ज्यामुळे या प्रकरणी आता पुणे पोलीस आयुक्तांनी दोषी पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा

उभारला आहे.

पुणे पोलीस आयुक्तांनी या प्रकरणी सदाशिव पेठेपासून काही मिनिटांच्या अंतरावर असलेल्या पेरुगेट पोलीस चौकीतील पोलीस हवालदारासह तीन कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. पोलीस हवालदार सुनील शांताराम ताठे, पोलीस कर्मचारी प्रशांत प्रकाश जगदाळे आणि सागर नामदेव राणे अशी निलंबित करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची नावे असल्याची माहिती देण्यात आली आहे. ज्यावेळी सदाशिव पेठेत तरुणीवर कोयत्याने हल्ला झाल्याची घटना घडली, त्यावेळी पेरुगेट पोलीस चौकीत एकही कर्मचारी उपस्थित नव्हता. तर बीट मार्शल यांनी देखील घटनास्थळी यायला २० मिनिटं लावली. यामुळे ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती पोलीस उपायुक्त संदीप गिल यांच्याकडून देण्यात आली आहे.

महिला सहकारी बँकेत ९७ कोटींचा अपहार

सुराज्य/यवतमाळ

येथील अवसायानात निघालेल्या बाबाजी दाते महिला सहकारी बँकेतील ९७ कोटींच्या वसुलीप्रकरणी बँकेच्या महिला संचालकांसह व्यवस्थापक व इतर अधिकाऱ्यांच्या मालमत्ता अवसायकांनी गोठविल्या (फ्रिज) असून त्यांच्या मालमत्तांवर टाच आली आहे. जिल्हा निबंधक कार्यालयाकडे हा आक्षेप पाठविण्यात आला आहे. त्यामुळे संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कर्मचारी अशा १६ व्यक्तींच्या मालमत्तांचे व्यवहार थांबणार आहेत.

कुठलीही मालमत्ता विकण्यापूर्वी अथवा तारण म्हणून गहाणात ठेवण्यापूर्वी अवसायक कार्यालयाची संमती घ्यावी लागणार आहे. बाबाजी दाते महिला सहकारी बँकेत अधिनियम १९६० चे कलम ८८ (१) अन्वये चौकशी करण्यात आली.

राज्यातील 'या' अधिकाऱ्यांना आयएएस दर्जा बहाल

सुराज्य/वर्धा

लोकसेवा आयोगामार्फत निवड होत राजपत्रित अधिकारी होण्याचे प्रत्येक होतकरू सुशिक्षीत तरूणाचे ध्येय असते आणि निवड झाल्यावर कधीतरी सनदी अधिकाऱ्याचा दर्जा मिळावा, अशी सुप्त इच्छा तो बाळगून असतात. मात्र, निवडकांनाच अशी संधी प्राप्त होते. अशीच संधी आता राज्यातील काही अधिकाऱ्यांना मिळाली आहे. तसे नोटिफिकेशन केंद्र सरकारच्या विनंतीने राष्ट्रपती भवनातून निघाले आहे.

राज्यातील खालील अधिकाऱ्यांना आता आयएएस अधिकाऱ्याचा दर्जा बहाल होणार आहे. जी. एम. गढीकर, पी. बी. खपले, ए. पी. पाठक, जी. आर. खरात, डॉ. पी. पी. देवरे, एम. डब्लू. साळवे, एम. पी. देशमुख, डॉ. बी. एन. बस्तेवाड यांना १ जानेवारी २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१ या दरम्यान रिक्त झालेल्या जागांवर नियुक्ती मिळेल. तर १ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२ या दरम्यान रिक्त झालेल्या जागांवर सतीशकुमार दत्तात्रय खडके, संजय श्रीपतराव काटकर, डॉ. माधव नामदेव कुसेकर, पराग सुरेश सोमण, अनिलकुमार खंडेराव पवार, सचिन बंडोपंत कलंत्रे, श्रीधर बापूराव दुबे, विकास मारोती पानसरे व मनोज विजय रानडे यांना आयएएसच्या दर्जा बहाल करीत नियुक्ती मिळेल.

प्रामुख्याने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून यांना नियुक्ती मिळण्याची शक्यता आहे. वर्धा येथे जात पडताळणी अधिकारी म्हणून कार्यरत जी. एम. गढीकर यांचाही यास समावेश झाला आहे.

लाचखोरीत महसूल आणि पोलीस विभाग अव्वल

नाशिक पहिल्या तर पुणे द्वितीय स्थानावर

सुराज्य/नागपूर

राज्यात लाचखोरी आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये सातत्याने वाढ होत असून लाचखोरीत महसूल विभाग पहिल्यावर तर पोलीस विभाग द्वितीय स्थानावर आहे. गेल्या सहा महिन्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ४३४ सापळे रचले असून त्यात ६०५ शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना अटक केली आहे, अशी धक्कादायक आकडेवारी एसीबीच्या संकेतस्थळावर प्रकाशित झाली आहे.

शासकीय विभागात लाच दिल्याशिवाय कोणतेच काम होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. अनेकजण कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा नाहक त्रास नको म्हणून चिरीमिरी देतात. तर सामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयाच्या वारंवार पायऱ्या झिजवाव्या लागतात. लाच न मिळाल्यास शासकीय कर्मचारी सामान्य नागरिकांचे काम करीत नाहीत. राज्यात लाचखोरी प्रत्येक शासकीय विभागात वाढली

असून महसूल विभाग पहिल्या तर पोलीस विभाग द्वितीय क्रमांकावर कायम आहे.

महसूल विभागात सर्वाधिक तलाठी तर पोलीस विभागात सर्वाधिक पोलीस हवालदारांचा लाचखोरांमध्ये समावेश आहे.

नागपूर परीक्षेत्रात तक्रारदारांना योग्य प्रतिसाद नाही

नाशिकमध्ये सर्वाधिक लाचखोरीचे गुन्हे दाखल झाले असून तब्बल ९१ शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर सापळे रचण्यात आले. त्यानंतर लाचखोरीत द्वितीय स्थानावर पुणे आणि छत्रपती संभाजीनगर असून प्रत्येक ७४ लाचखोरीचे गुन्हे दाखल आहेत. तिसऱ्या स्थानावर ठाणे (५४) असून नागपूरचा (४३) सातवा क्रमांक लागतो. नागपूर परीक्षेत्रात अनेक तक्रारदारांना योग्य प्रतिसाद मिळत नसल्यामुळे सापळा कारवाईमध्ये राज्यात शेवटच्या क्रमांकावर असल्याचे समोर आले.

गेल्या सहा महिन्यात महसूल विभागात १०४ लाचखोरीचे सापळे रचले गेले असून त्यात १४२ लाचखोर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये ८७ वर्ग तीनच्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. पोलीस विभागावर ७९ सापळे रचले गेले असून १०९ लाचखोर पोलीस अधिकारी आणि पोलीस कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली. त्यात ८४ पोलीस हवालदारांचा समावेश आहे. तिसऱ्या स्थानावर पंचायत समिती असून ४५ सापळे रचण्यात आले असून ५९ लाचखोर अधिकारी-कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली. त्यानंतर लाचखोरीत महापालिका, वीज महामंडळ आणि शिक्षण विभागाचा क्रमांक लागतो.

लाचखोरीची आकडेवारी

महिना	सापळा	आरोपी
जानेवारी	५९	०४६
फेब्रुवारी	७५	१११
मार्च	८८	१२४
एप्रिल	७०	१००
मे	६९	१००
जून	७३	०९०

आम्ही जातो आमुच्या गावा, आमचा राम राम घ्यावा

वारकरी परतीच्या प्रवासाला निघाले

✔ सुराज्य/पंढरपूर

व्दादशी दिवशी म्हणजे शुक्रवारी आषाढी एकादशीचा उपवास सोडून वारकरी सकाळपासूनच परतीच्या प्रवासाला निघाले. आम्ही जातो आमच्या गावा, आमचा राम राम घ्यावा म्हणत वारकरी परतीच्या प्रवासाला निघाले.

एकाचवेळी एसटी बसेस व खासगी वाहनं रस्त्यावर आल्याने पंढरपुरातील सर्वच मार्गांवर गाड्यांच्या १-२ किलोमीटरच्या रांगा लागल्या होत्या. ठीक ठिकाणी पोलीस वाहतूक सुरळीत करण्याचे काम करत होते. एस टी बस स्थानक, रेल्वे स्टेशनवर भाविकांची मोठी गर्दी होती. भाविक सर्व सामान घेऊन रेल्वे स्टेशनवर रेल्वेची वाट पाहत होते. खासगी वाहनाने ओलेले भाविकांच्या गाड्यांनी रस्ते जाम झाले होते. सकाळ ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत पोलीस वाहतुकीचे सुरळीत करत होते. यंदा गाड्यांच्या पार्किंग योग्य प्रकारे झाल्यामुळे जास्त वेळ जाम झाले नाही. सकाळी पंढरपूर -मोहोळ,पंढरपूर-कुर्डुवाडी रस्त्यावर काहीकाळ ट्राफिक जाम झाले होते. दुपारपर्यंत भाविकांची वाहने पंढरपुरातून बाहेर पडली.

निरादेवधर-धोम बळकवडी जोड कालव्याची निविदा निघाली

खा. निंबाळकर यांनी सोडवला माढा मतदारसंघातील पाणीप्रश्न

✔ सुराज्य/सोलापूर

देशामध्ये पहिला अभिनव कालवा जोड प्रकल्प महाराष्ट्रात राबवला जात आहे. त्याचा सर्वाधिक जास्त फायदा हा माढा लोकसभा मतदारसंघातील फलटण तालुक्याला होणार आहे. निरादेवधर कालवा आणि धोम बळकवडी एकमेकाला जोडण्याचा हा प्रकल्प आहे. याची ३७ कोटी ७७ लाखांची निवीदा निघाली आहे. मतदारसंघाचे खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी यासाठी प्रयत्न केले होते, अखेर त्याला यश आले आहे.

निरादेवधर कालवा आणि धोम बळकवडी एकमेकाला जोडण्याचा हा प्रकल्प भोर तालुक्यातील उतरोली येथे साकारला जात आहे. निरा देवधर चा कालवा जो आहे धोम बळकवडीच्या कालव्याला जोडला जाणार आहे. या दोन कालव्याच्या मधले अंतर जवळपास साडेतीन कि.मी आहे. हे दोन कालवे जोडले जाणार आहेत. निरादेवधरच्या कालव्यामध्ये किलोमीटर २२ येथून पॉईंट ९३ टीएमसी पाणी उचलून ते धोमबळकवडी कालव्यामध्ये टाकण्यात येणार आहे. त्यातून ते पाणी त्या लाभक्षेत्रात धोमबलकवडीच्या लाभक्षेत्रामध्ये दिले जाणार आहे त्याच्या सर्वाधिक जास्त फायदा

हा फलटण तालुक्याला होणार आहे. सध्या केवळ १ टीएमसीचे आवर्तन धोमबलकवडीला मिळत आहे. त्यामुळे हा चारमही कालवा आहे असे मानले जाते. आता जोड प्रकल्प पूर्ण झाल्यावर हा प्रकल्प आठमही होणार आहे. याचा फायदा फलटण तालुक्याला मिळणार आहे. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने याची निविदा प्रसिध्द केली आहे. ३७ कोटी ७७ लाखांची ही निविदा असून साडेतीन कि.मी. कालवा खोदायचा आहे. १८ महिन्यांमध्ये हे काम पूर्ण कराच्या अशा सूचना देण्यात आल्या आहेत. मध्यंतरी खा. रणजितसिंह निंबाळकर यांनी जलसंपदा विभागाच्या बैठकीमध्ये हा प्रश्न मांडला होता. त्याला उपमुख्यमंत्री आणि जलसंपदामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली होती. यानंतर याबाबतचे शासकीय आदेश निघाले होते आणि आता प्रत्यक्षात याच्या कामाला सुध्दा निविदा निघून सुरुवात होत आहे. त्यामुळे माढा लोकसभा मतदारसंघातला एक पाण्याचा प्रश्न सोडवण्यात निंबाळकर यांना यश आले आहे.

नियमित आवर्तने मिळून शेतकऱ्यांना न्याय मिळणार

जोड प्रकल्प पूर्ण झाल्यावर हा प्रकल्प आठमही होणार आहे. याचा जास्त फायदा फलटण तालुक्याला मिळणार आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने नियमित आवर्तने मिळून शेतकऱ्यांना न्याय मिळणार आहे, असे खा. रणजितसिंह निंबाळकर यांनी सांगितले.

सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयातील ई-कोर्ट फायलिंग कक्षाचे उद्घाटन

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालय कोर्ट फायलिंग कक्षाचे उद्घाटन करण्यात आले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ई-कोर्ट फाईलींग प्रणाली सक्तीची केली आहे. अनेक न्यायालयात आवश्यक ती अद्ययावत साधनसामूग्री उपलब्ध नसल्याने त्यास विलंब होत होता.ही बाब वकिलाची राज्य पातळीवरील प्रमुख संघटना असलेल्या महाराष्ट्र बार कौन्सिलने ओळखली व राज्यातील सर्वोच्च न्यायालयात संबधीत वकिल संघाला ही साधनसामुग्री पुरविण्याचे धोरण तत्कालीन बार कौन्सिलचे चेअरमन ॲड. मिलींद थोबडे यांच्या कार्यकाळात ठरली होती. याला आता यश आले आहे.

सोलापूर वकिल संघाकरिता ३० जून रोजी साधनसामूग्री

देण्यात आली आहे. यावर जिल्हा न्या. डॉ. शब्बीर औटी यांनी तत्काळ सोईची जागा उपब्ध करून दिली. त्या जागेत ई-कोर्ट फाईलींग कक्षाचा शुभारंभ औटी यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी मुख्यदंडाधिकारी विक्रमसिंह भंडारी, दिवाणी न्या. शंतुनू जहागिरदार, न्या.पी. ए. कुंभोजकर, न्या. यु.पी. देवर्षी विधीसेवा प्राधीकरणाचे न्या. नरेंद्र जोशी प्रबंधक पैठणकर, डिफेन्स लॉयर्स कक्षाच्या प्रमुख ॲड. राऊत आदी उपस्थिती होते. प्रास्ताविक ॲड. मिलींद थोबडे यांनी केले. आभार विधीज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड.सुरेश गायकवाड यांनी मानले. यावेळी ॲड. आसिम बांगी, सचिव ॲड.करण भोसले, खजिनदार ॲड.आविनाश काळे, निता रणश्रृंगारे, ॲड. रेवण पाटील ॲड. विनोद सूर्यवंशी, ॲड. अभिजीत ईटकर, ॲड.सुनिल क्षीरसागर आदी उपस्थित होते.

चोरट्याने घराचे कुलूप तोडून ९० हजारांचा ऐवज पळवला

✔ **सोलापूर** : अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून घरातील नव्वद हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना २४ जून रोजी लक्ष्मी लॉन्ड्री जवळील मनोहर नगर झोपडपट्टी येथे रात्री घडली. याप्रकरणी केशर चैनू उडाणशिवे (वय-३०,रा.लक्ष्मी लॉन्ड्री जवळ,मनोहर नगर झोपडपट्टी) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरटेविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. केशर हे भाऊ कमलाकर टोणपे हा आजारी असल्याने त्याला पाहण्यासाठी रमाबाई झोपडपट्टी येते गेले होते.त्यावेळी चोरट्याने फिर्यादी यांच्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करून किचन मधील लोखंडी कपाटातील १५ हजार रुपये किमतीची सोन्याची बोरमाळ,१५ रुपये किमतीचे सोन्याचे पेंडल,३० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण,१५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे अष्टपैलू मणी,५ हजार रुपये किमतीची सोन्याची ठुसी आणि १० हजार रुपये रोख रक्कम असा एकूण १० हजारांचा ऐवज चोरून नेला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक धायगुडे हे करीत आहेत.

गोंधळ घातल्याप्रकरणी २० जणांवर गुन्हा

✔ **सोलापूर** : लग्न कार्यात आरडा ओरड केल्याचा जाब विचारल्याने गोंधळ घातल्याप्रकरणी वीस जणांवर गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत गणेश सुरेश अंपेपागोलू (वय-२५,रा.बापूजी नगर,उत्तर सदर बझार) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. गणेश अंपेपागोलू यांच्या भावाचे लग्न सुरू होते. तेव्हा वरील आरोपी हे लग्नात येऊन आरडा ओरड करू लागले. याचा जाब गणेश यांनी विचारला असता आरोपींनी गोंधळ यालत परिसरातील विटा, दगड, फरशीचे तुकड्याने फेकून त्यांना मारहाण केली. अभिषेक चौधरी, गोविंद अंबेवाले, प्रकाश अंबेवाले, हिरा जमादार, आनंद पंतुवाले, शितल खंडेवाले, राजू अंबेवाले, नितीन अंबेवाले, कादर, निलेश ऊर्फ विचे व इतर आठ ते दहाजणांवर गुन्हा दाखल झाला आहे.

पूर्ववैमनस्यातून मारहाण; दोघांवर गुन्हा

✔ **सोलापूर** : मागील भांडणाचा राग मनात धरून दोघा भावांनी मिळून फिर्यादी प्रकाश तुकाराम सोनकांबळे (वय-३३,रा.मु.पो.आलेगाव) यांना डोक्यात दगड फेकून मारून जखमी केले.तसेच भाचा संतोष याला मुक्कामार लागला आहे.ही घटना विजापूर रोडवरील निर्मिती विहार येथे २८ जून रोजी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी प्रकाश सोनकांबळे यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अक्षय परमेश्वर बनसोडे व अजय परमेश्वर बनसोडे या दोघा भावांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. तपास पो.हे.कॉ. फुलारी हे करीत आहेत.

चोरट्याने घरातून मोबाईल पळवला

✔ **सोलापूर** : घरातील हॉलमध्ये अज्ञात चोरट्याने प्रवेश करून दहा हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना २२ जून रोजी दुपारी दीड ते साडेचार वाजण्याच्या दरम्यान इंदिरानगर बेयर हौसिंग सोसायटी विजापूर रोड येथे घडली.याप्रकरणी इलाही कासीमसाब शेख (वय-३६,रा.इंदिरानगर बेयर हौसिंग सोसायटी) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

डॉ. यशवंत कुलकर्णी यांच्या वाढदिवसानिमित्त टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा

✔ सुराज्य/श्रीपूर

श्रीपुर येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक आणि महाराष्ट्र राज्य एम डी असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. यशवंत कुलकर्णी यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक ११ ते १५ जुलै रोजी सुपंत चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन रिपाइंचे तालुका युवक सचिव व जिगरबाज ग्रुप व राजरत्न नाईक नवरे मित्रपरिवारांच्यावतीने करण्यात आले आहे.

स्पर्धेसाठी पहिले बक्षीस १ लाख एक रुपये, दुसरे बक्षीस ५० हजार एक रुपये, तिसरे बक्षीस २० हजार एक रुपये, चौथे बक्षीस २० हजार एक रुपये इत्यादी बक्षिसे ठेवण्यात आली असून, वैयक्तिक बक्षीसही ठेवण्यात आली आहेत. क्रिकेट स्पर्धेत भाग घेणाऱ्या संघाला १० हजार रुपये प्रवेश फी ठेवण्यात आली आहे. ज्या क्रिकेट संघांना स्पर्धेत भाग घ्यायचा आहे त्यांनी आकाश गोदे ९६०४ ६०४८१०, हरी आडगळे ८६३७ ७९२७८२, प्रदिप लोंढे ९६८९९४१४५९, अभिषेक तळे ९५५२९३३०९३, अक्षय दिक्षित ८६६८५२८९५५, करण लांडगे ९२०६ ९५१३१३ यानंबरवर संर्पक साधावा असे अवाहन राजरत्न नाईकनवरे यांनी केले आहे.

सासरी सोडायला निघालेला पिता अपघातात ठार

मुलगी गंभीर जखमी

✔ सुराज्य/सांगोला

सांगोला मुलीला सासरी सोडण्यासाठी निघालेल्या वडिलांच्या कारला टेम्पोने समोरून जोराची धड़क बसली. या अपघातात वडिलांचा जागीच मृत्यू झाला, तर डोक्याला मार लागून मुलगी गंभीर जखमी झाली. तिच्यावर मिरज येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. सुरेश मारुती बोबलादे (वय ५४, रा. लक्ष्मीदहिवडी, ता. मंगळवेढा) असे मृत पित्याचे नाव आहे.

हा अपघात गुरुवार २९ जून रोजी दुपारी ३.४५ वाजेच्या सुमारास सांगोला जतरोडवर सोनंद येथेचव्हाण मळा परिसरात घडला. या अपघातात त्यांची मुलगी भक्ती प्रभु संक्रट्टी (वय १९, रा. वाळेगिरी, ता. अथणी, जि.बेळगाव) ही जखमी झाली आहे. या अपघातप्रकरणी बोबलादे यांचा मुलगा शुभम सुरेश बोबलादे (रा. लक्ष्मी दहिवडी) याने फिर्याद दिली आहे. भक्ती हिचा दि. २९ मे रोजी बाळगिरी (ता. अथणी) येथील प्रभू संकट्टी यांच्याशी विवाह झाला होता. विवाहनंतर मुलगी माहेरी आली होती.

तिला सासरी सोडण्यासाठी २९ जून रोजी वडील सुरेश बोबलादे हे कार (एम.एच.१३/ बी.एन. ५७६३) येऊन लक्ष्मी दहिवडी येथून सांगोला मार्गे बाळेगिरीला निघाले होते. त्यांची कार सांगोला- जतरोडवरून सोनंदजवळील चव्हाण मळा परिसरात आली असता भरधाव वेगातील टेम्पो (एम. एच. १०/ ए. ४९१५) ने समोरून जोराची धडक दिली. अपघातातील टेम्पो रस्त्याच्या कडेला पलटी झाला. या अपघातात पुढच्या दोन्ही सीटवर बसलेले सुरेश बोबलादे व मुलगी भक्ती हे दोघे गंभीर जखमी झाले. या अपघातानंतर टेम्पो मालकानेच उपचाराकरिता दोघांना सांगोला येथील खासगी रुग्णालयात दाखल केले होते. सुरेश बोबलादे यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला

चोरट्याने दुचाकी पळवली

✔ **सोलापूर** : अन्नपूर्णा स्वीट मार्ट येथे पार्क केलेली दुचाकी क्र.एमएच.१३.बीएम.८२१५ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना २३ जून रोजी रात्री आठ ते पावणे नऊ वाजण्याच्या दरम्यान अन्नपूर्णा स्वीट मार्ट सोलापूर येथे घडली.याप्रकरणी सुभाष कृष्णात गोटे (वय-७०, रा.लक्ष्मी नगर बाळे) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

सोन्याच्या दागिन्यांची चोरी

✔ **सोलापूर** : अज्ञाताने फिर्यादी अश्विनी दीपक चौधरी (वय-३०, रा.रुद्रमणी नगर, कुमठा नाका) यांच्या घरात प्रवेश करत बेडरूममधील रोख रक्कम व लहान मुलीचे कानातील रिंगा चोरून नेले.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे प्रश्न लवकरच मार्गी लावणार : मुख्यमंत्री

✔ सुराज्य/मोडनिंब

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे प्रश्न लवकरच मार्गी लावणार आहे. हे आपले सरकार आहे. त्यामुळे आपले सर्व प्रश्न मला व्यवस्थित समजावून येऊ द्या, कोणते महत्वाचे प्रश्न आपणास सोडवता येतील हे पाहिल्यानंतर किंवा संबंधित अधिकारी यांच्याशी चर्चा केल्यानंतर मी तुमच्या प्रश्नासाठी मंत्रालयात संघटनेच्या प्रतिनिधींना आवर्जून बोलावून येऊन आपले प्रश्न निकाली काढण्याचा प्रयत्न करणार आहे, असे आश्वासन मुख्यमंत्री

एकनाथ शिंदे यांनी दिले.

राज्यातील ६० हजार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन गेल्या तीन महिन्यांपासून रखडल्याने वेतन तत्काळ आदा करा व इतर प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत जिल्हा परिषद नगर परिषद कामगार युनियनतर्फे पंढरपूर येथे भिक मागो आंदोलन शासकीय विश्रामगराच्या गेट समोर करण्यात सुरू करण्यात आले होते. पोलीस प्रशासनाने कामगार युनियनच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्री शिंदे यांच्यासोबत भेट घालून दिली, यावेळी त्यांना युनियनच्या वतीने मुख्यमंत्री शिंदे यांना निवेदन देण्यात आले. मुख्यमंत्री शिंदे यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना शब्द दिल्याने संपूर्ण महाराष्ट्र राज्यात ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाल्याचे प्रदेशाध्यक्ष मोहन लामकाने कार्याध्यक्ष अरुण सुर्वे, दिलीप जाधव यांनी सांगितले. यावेळी संग्राम नागणे, नागेश लोंढे, नितीन सावंत, गुरुबाबा भोसले, अमोल मोरे, श्रीकृष्ण ढोले, बालाजी पवार, जनार्दन करपे, बंडू चंदनशिवे, पांडुरंग खरात, सोमनाथ शेंबडे, नाथा भगत आदी उपस्थित होते.

भाजप शहराध्यक्षपदासाठी हालचालींना वेग

येत्या पंधरवड्यात होणार निवड; विक्रम देशमुखांसह अनेक नावे चर्चेत

✔ सुराज्य/सोलापूर

भारतीय जनता पक्षाच्या शहराध्यक्षपदासाठी आता हालचाली वाढल्या असून पुढील महिन्यातील पंधरवड्यापर्यंत भाजपला नवा अध्यक्ष मिळण्याची शक्यता आहे. यात कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शहराध्यक्षपदावर देशमुख हेच कायम राहतील असेही काही जणांचे म्हणणे आहे. तर दुसरीकडे हेमंत पिंगळे, अनंत जाधव, नरेंद्र काळे, चन्नवीर चिट्टे यांची नावेही चर्चेली जात आहेत.

गेल्या महिन्यात भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे सोलापूर दौऱ्यावर आले होते, त्यावेळी त्यांनी शहर आणि जिल्हाध्यक्ष बदलण्याचे संकेत दिले होते. त्यामुळे मे किंवा जूनमध्ये शहराध्यक्ष निवड होईल अशी चर्चा होती. मात्र त्याच दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याकाळाला ९ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल भाजपाचे महाजनसंपर्क अभियान महिनाभर सुरू केले, त्यामुळे या निवडी लांबल्या होत्या. आता ३० जून रोजी हे अभियान संपणार आहे. त्यामुळे आता शहराध्यक्षपदाच्या हालचालींना वेग आला आहे. शहर अध्यक्ष

निवडीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरातील काही स्थानिक नेत्यांनी मुंबई गाठून लॉबिंग केले. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली होती. सध्या विक्रम देशमुख हे शहराध्यक्ष आहेत. पण त्यांच्यावर लोकसभा निवडणूक तयारीची जबाबदारी दिल्याने नवीन अध्यक्ष निवडला जाण्याची शक्यता वाढली आहे. पण लोकसभा अध्यक्षपद एप्रिल २०२४ नंतर जाणार आहे. त्यामुळे शहराध्यक्षपदावर देशमुख हेच कायम राहतील असेही अनेकांचे म्हणणे आहे. दोन्ही देशमुखांमध्ये आतापर्यंत तरी त्यांनी समन्वय साधल्याचे दिसून येते. त्यामुळे दोन्ही देशमुखांनी त्यांच्याच नावाला हिरवा कंदिल दाखवल्याचे बोलले जात आहे. असे असले तरी दुसरीकडे पांडुरंग दिड्डी, हेमंत पिंगळे, अनंत जाधव, नरेंद्र काळे, चन्नवीर चिट्टे यांची नावेही चर्चेली जात आहेत.

अध्यक्षपद वशिल्यावर नको मेरिट वर द्या

आतापर्यंत अध्यक्षपद देताना स्थानिक नेत्यांनी केलल्या वशिलाच कामी येतो. मेरीटवर अध्यक्षपद कधी देणार असा प्रश्न भाजपाचे जुने कार्यकर्ते विचारत आहेत. भाजपचे अनेक एकनिष्ठ कार्यकर्ते आहेत, त्यांना आतपर्यंत कुठेच संधी मिळालेली नाही, ते यंदा संधीच्या प्रतिक्षेत आहेत.

नव्या अध्यक्षाची कसोटी

भाजपच्या नवीन होणाऱ्या अध्यक्षाची कसोटी लागणार आहे. नव्या अध्यक्षाच्या नेतृत्वाखालीच महापालिका लोकसभा आणि विधानसभा निवडणुका होणार आहेत.

दुचाकी दिली नाही म्हणून मुलाची आत्महत्या

✔ **सांगोला** : बाल दिंडीला जाण्यासाठी पित्याने दुचाकी दिली नाही म्हणून रागाच्या भरात १४ वर्षीय मुलाने साडीने झाडाच्या फांदीला गळफास घेऊन आत्महत्या केली.

यश राजेंद्र काळे (वय १४, रा. गुणापवाडी, ता. सांगोला) असे त्या मुलाचे नाव असून गुरुवारी सकाळच्या सुमारास सांगोला तालुक्यात गुणापवाडी येथे ही घटना घडली. याबाबत पांडुरंग वायमोडे यांनी पोलिसात खबर दिली आहे. यश काळे हा (रा. बेवनूर,ता.जत) येथे हायस्कूलमध्ये आठवीत शिकत होता. गुरुवारी हायस्कूलमध्ये आषाढी एकादशी निमित्त दिंडी आयोजित केली होती. तेथे जाण्यासाठी त्याने वडिलांकडे दुचाकी मागितली. त्यावेळी वडिलांनी त्यास नकार दिला. नंतर रागाच्या भरात घराच्या जांभळीच्या झाडाच्या फांदीला साडीने गळफास घेतला.